POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

# मराठी दैनिक मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२८७ ● मुंबई, सोमवार, १९ मे २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

- वापरण्यास उपलब्ध साठवण क्षमता: ९३.५५ दशलक्ष घनमीटर (२५५ दशलक्ष लिटर प्रतिदिन).
- धरणाची लांबी: २४५० मीटर; उंची: ७१.६० मीटर.
- धरणाचा प्रकार: गेटेड स्पिलवे असलेले मातीचे धरण.
- स्पिलवे गेट्सचा आकार : १२ मीटर * ६.५ मीटर (४ गेट्स).

**प्रकल्पाची सद्यस्थिती**

- मे, २०२५ मध्ये देहरजी मध्यम प्रकल्प सुमारे ८०% पूर्ण झाला आहे.
- २०२७ च्या अखेरीस हा प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे.
- मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या देहरजी मध्यम प्रकल्पातून उपलब्ध होणाऱ्या जलसाठ्याच्या वापरासाठी व्यापक पाणीपुरवठा योजनेचा सखोल प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. तांत्रिक सल्लागाराच्या देखरेखीखाली सर्वेक्षण आणि इतर क्षेत्रकार्य प्रगतीपथावर आहे.

**प्रकल्पाचे फायदे**

- देहरजी धरणामुळे 93.55 दशलक्ष घनमीटर (प्रतिदिन २५५ दशलक्ष लिटर) पाण्याची साठवण क्षमता उपलब्ध होईल.
- वसई-विरार महानगरपालिकेसाठी १९० एमएलडी पाणी राखीव आहे.
- पाणी पुरवठा मार्गावर असलेल्या ग्रामीण भागांसाठी 15 एमएलडी पाणी.
- सिडको पालघर क्षेत्रासाठी ५० एमएलडी.

**पाणी कुठे अधिक वापरण्यात येईल**

- वसई-विरार महानगरपालिका
- सिडको
- पालघर जिल्हा परिषद

## राज्यात होतेय आणखी १ धरण...

### ८० टक्के पूर्ण, ‘या’ परिसरातील पाण्याचा प्रश्न सुटणार!

**■मुंबई । प्रतिनिधी :**

महाराष्ट्रात आणखी एक धरण पूर्णत्वास येत आहे. या धरणामुळं तीन शहरांना पाणीपुरवठा होणार आहे. या प्रकल्पाचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यातील सुकसाळे गावाजवळून वाहणाऱ्या पश्चिमवाहिनी वैतरणा नदीची उपनदी असलेल्या देहरजी नदीवर हा प्रकल्प आहे. या प्रकल्पांतर्गत माती व दगडांचा वापर करून धरण बांधण्यात येत असून या प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता ९५.६० दशलक्ष घनमीटर इतकी आहे. त्यापैकी ९३.२२ दशलक्ष घनमीटर म्हणजे साधारण प्रतिदिन २५५ दशलक्ष लिटर इतके पाणी पिण्यासाठी उपलब्ध होणार आहे.



कोकण पाटबंधारे विकास महामंडळातर्फे (केआयडीसी) या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. केआयडीसी व एममएमआरडीए यांच्यातील सामंजस्य करारानुसार एमएमआरडीएने या प्रकल्पासाठी २५९९.१५ कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य केले आहे.

केआयडीसीने २७ जुलै, २००६ रोजी मे. पीव्हीआर प्रोजेक्ट्स लि. यांच्याशी प्रकल्प अंमलबजावणीचा करार केला आणि या धरणाद्वारे व्यापक पाणीपुरवठा योजनेची अंमलबजावणी करण्यासाठीचा सखोल प्रकल्प अहवाल एमएमआरडीएतर्फे तयार करण्यात येत आहे.

**प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये**

देहरजी नदीवर माती आणि दगडांचा वापर करून बांधण्यात येणाऱ्या प्रस्तावित धरणाची एकूण साठवणूक क्षमता ९५.६० दशलक्ष घनमीटर आहे.

## मुंबईकरांची चिंता वाढवणारी बातमी

### फक्त ६० दिवस पुरेल एवढाच पाणीसाठा शिल्लक



मुंबईच्या तलावात फक्त ६० दिवस पुरेल एवढाच पाणीसाठा शिल्लक राहिल्याने मुंबईकरांच्या चिंतेत भर पडली आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांमध्ये फक्त १८ टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या सात तलावांची पातळी साठवण क्षमतेच्या 18 टक्क्यांपर्यंत घसरली आहे. मुंबईकरांना पुढील ६० दिवस पाणीपुरवठा करता येईल, इतकाच पाणीसाठा शिल्लक आहे. परंतु, गेल्या वर्षीच्या तुलनेत हा पाणीसाठा सहा टक्के अधिक आहे. मुंबई महानगरपालिका परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. मुंबईला मोडक सागर, तानसा, अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा, तुळशी, विहार आणि भातसा या सात तलावातून दररोज 3 हजार ९५० दशलक्ष लीटर पाणीपुरवठा केला जातो. यापैकी दोन तलाव मुंबईमध्ये आहेत, तर उर्वरित ठाणे, पालघर आणि नाशिकच्या शेजारच्या जिल्ह्यांमध्ये आहेत. पावसाळ्यात या तलावांचं पाणलोट क्षेत्र भरतं आणि हे पाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या फिल्टरेशन प्लांटमध्ये पोहोचवलं जातं. त्या पाण्याच्या शुद्धीनंतर घराघरात आणि व्यावसायिक आस्थापनांना पाणीपुरवठा केला जातो. सात तलावांमध्ये एकूण १४.४ लाख दशलक्ष लिटर पाणी साठवण्याची क्षमता असून बीएमसी दररोज ३८५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करते.

गेल्या काही वर्षांपासून मुंबईतील वाढते औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यामुळे पाण्याची मागणी वाढली आहे. दरम्यान तानसा, मध्य वैतरणा, भातसा आणि अप्पर वैतरणा या प्रमुख पुरवठा तलावांमधील पाण्याची पातळी २० टक्क्यांपेक्षा कमी झाली. बीएमसीने अप्पर वैतरणा आणि भातसा येथून १.८१ लाख दशलक्ष लिटरच्या राखीव साठ्यातून पाणी काढण्यासाठी राज्य सरकारची मान्यता मिळवली आहे. महापालिका अधिकाऱ्यांच्या मते, मुंबईकरांना जुलै अखेरपर्यंत पुरेल इतका पाणीसाठा आहे. उष्णतेमुळे जलद बाष्पीभवन होत असल्याने तलावांमध्ये पाण्याची पातळी नेहमीपेक्षा वेगाने कमी होत असल्याचा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे. महापालिकेच्या अंदाजानुसार, एक टक्के पाणीसाठा सुमारे तीन दिवस पुरतो. दरम्यान गेल्या वर्षी मे महिन्यात पाण्याची पातळी झपाट्याने कमी झाल्याने ५ जून २०२४ पासून ५ टक्के पाणीकपात करण्यात आलं होतं.

**मुंबईत मान्सूनचं आगमन**

सर्वसाधारणपणे १५ जूनपर्यंत होतं. परंतु गेल्या काही वर्षांपासून मुंबईत मान्सूनचं उशिरा आगमन होतंय. जूनच्या शेवटच्या आठवड्यातच पावसाचा जोर वाढलेला दिसतो. विशेष म्हणजे या तलावांचं पाणलोट क्षेत्र हे पालघर, ठाणे आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये आहेत. तिथे जुलैच्या मध्यापूर्वी जोरदार पाऊस सुरू होत नाही.

## जिथं आयुष्याची सुरुवात केली तिथचं आयुष्याचा शेवट झाला

**■सोलापुर । प्रतिनिधी :**

सोलापुरात अक्कलकोट रोडवरच्या टेक्स्टाईल कारखान्यात अग्नितांडव झाले. या आगीत 8 जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. या आगीत टेक्स्टाईल कारखान्याचे मालक उस्मान मन्सूरी यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील इतर तिघांचा करूण अंत झालाय. सोलापुरात आगीच्या घटना सातत्याने घडत आहे. त्यामुळे उपाय योजनेबाबत आता चर्चा होतीये. तब्बल १० तासांहून अधिक काळ आग धुमसतच होती. तब्बल १०० पेक्षा अधिक अग्निबंबांचा वापर करत आग आटोक्यात आणण्यात आली.



**टेक्स्टाईल कारखान्याच्या आगीच्या घटनेतील मृत व्यक्ती**

- उस्मान मन्सूरी - वय ८७
- अनस मन्सूरी - वय २४
- शीफा मन्सूरी - वय २४
- युसुफ मन्सूरी - वय १ वर्ष
- आयेशा बागवान - वय ३८
- मेहताब बागवान - वय ५१
- हिना बागवान - वय ३५
- सलमान बागवान - वय ३८

सोलापुरच्या अक्कलकोट एमआयडीसी परिसरातील टॉवेल तयार करणाऱ्या कारखान्यात पहाटे चारच्या सुमारास आग लागली. कारखान्यातील कच्च्या मालामुळे आग वेगाने पसरत गेली, आणि आगीने रौद्ररूप धारण केले. या आगीत कारखान्याचे मालक उस्मान मन्सूरी यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील तीन सदस्य आणि अन्य ४ कर्मचारी असे एकूण ८ जण अडकले होते.

यात मन्सुरी यांच्यासह ८ जणांचा मृत्यू झाला. रेस्क्यू ऑपरेशनच्या दरम्यान ८ मृतदेह बाहेर काढण्यात आले. सदर घटनेत एकूण आठ जणांचा मृत्यू झाला असून यापैकी 3 महिला, 4 पुरुष आणि एका वर्षाच्या लहान चिमुकल्याचा मृत्यू झाला आहे.

कामगारांना वाचवण्यासाठी कारखान्याची भिंत फोडण्यात आली. आग विझवण्यासाठी जवळपास १०० पेक्षा अधिक अग्निशामक दलाच्या बंबाचा वापर करण्यात आला. या कारखान्यावर अडीचशे ते तीनशे कामगारांची उपजीविका भागत होती.

टेक्स्टाईलला भीषण आग लागल्याची माहिती कळताच भाजपाचे आमदार सुभाष देशमुख यांनी घटनास्थळी भेट दिलीय. सातत्याने एमआयडीसीमध्ये अशा घटना घडतायेत...मुख्यमंत्री आणि उद्योग मंत्र्यांनी याबाबत उपाययोजना करण्याची मागणी देशमुख यांनी केली आहे.

सोलापुरातील माजी आमदार नरसय्या आडम मास्तर यांनी अग्निशमन यंत्रणा वेळेवर आली नाही म्हणत संताप व्यक्त केलाय आणि चौकशीची मागणी केली आहे. तर या अग्नितांडवाची राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही माहिती घेतली. यावेळी पीडितांना आर्थिक मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. सोलापुरातल्या या आगीच्या घटनेने शहरात मोठी खळबळ उडाली.

## बीडमध्ये गुंडगिरी सुरुच... आणखी एका तरुणाला टोळक्यांकडून बेदम मारहाण

**■बीड । प्रतिनिधी :**

बीड जिल्ह्यातील गुंडगिरी सुरुच आहे. परळीतील मारहाणीच्या दोन घटना ताज्या असताना आणखी एका तरुणाला मारहाण करतानाचा व्हिडिओ समोर आला आहे. परळीतील योगीराज गित्ते या तरुणाला चार जणांच्या टोळक्यांकडून बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय. व्हिडिओत मारहाण करणारा आरोपी आदित्य गित्ते यानेच शिवराज दिवटे याला देखील मारहाण केली होती.



**काय आहे नेमकं प्रकरण**

अखंड हरिनाम सप्ताहून गावी परत जात असताना संध्याकाळच्या सुमारास शिवराज दिवटे याला टोळक्याकडून अडवण्यात आले, त्यानंतर त्याला बीडच्या परळीतील टोकवाडी परिसरात बेदम मारहाण करण्यात आली. जर वेळीच लोक आले नसते तर मी वाचलो नसतो असं शिवराज दिवटे याने म्हटलं आहे.

बीड जिल्ह्यातील दहशत काही केल्या थांबण्याचे नाव घेताना दिसत नाही. परळीतील योगीराज गित्ते या तरुणाला चार जणांच्या टोळक्याकडून मारहाण होत आहे. मारहाण करत असताना त्याचेही व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. सध्या हा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

दृश्यात दिसणारा हाच तो आरोपी आदित्य गित्ते आहे, त्याच्यासह टोळक्याने ही मारहाण केली आहे. घटना पाच महिन्यापूर्वीची असल्याचे समजते. या व्हिडिओनंतर जिल्ह्यात पुन्हा एकदा दहशत माजली आहे. दोन दिवसापूर्वी शिवराज दिवटे याला देखील मारहाण करणारा हाच आदित्य गित्ते आहे.

परळीच्या टोकवाडी परिसरात लिंबोटा येथील रहिवासी असलेल्या शिवराज दिवटे याला दोन दिवसापूर्वी अमानुष मारहाण झाली होती. त्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी सात आरोपीला अटक केली. त्यानंतर मात्र बीडमध्ये तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली आहे. आता याच प्रकरणातील दुसरा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. शिवराज दिवटे याच्या मित्रांनी परळी शहरातील समाधान मुंडे याला मारहाण केली होती. १६ मे रोजी दुपारी दोन वाजून पाच मिनिटांनी ही मारहाण झाली. त्यानंतर समाधान मुंडे याच्या मित्रांनी मिळून शिवराज दिवटे याला टोकवाडी परिसरात अमानुष मारहाण केली. समाधान मुंडे याला मारहाण करतानाचा हा व्हिडिओ समोर आल्यानंतर शहरातील तरुणांमधील किरकोळ वाद किती टोकाला पोहोचलाय याची प्रचिती येतेय. या व्हिडिओ नंतर शिवराज दिवटे याच्यासह त्याच्या मित्रांवर गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे.

बीडच्या परळीतील शिवराज दिवटे मारहाण प्रकरणी आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी भाजप आमदार सुरेश धस यांनी केलीय. या दरम्यान, प्रकरणातील २ आरोपी हे अल्पवयीन असून पुण्यातील पोर्शे प्रकरणानुसार त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. अशी मागणीही धस यांनी केली. तर बीडमधील गुंडगिरीत पोलीसच सहभागी आहेत असा आरोप विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनी केलाय.

## राज्यात पावसाचा जोर आणखी वाढणार, आजपासून मुसळध... जिल्ह्यांना अलर्ट

**■मुंबई । प्रतिनिधी :**

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून वातावरणात सातत्याने बदल होताना दिसतायेत. गेल्या आठवड्याभरापासून संपूर्ण राज्यात पावसाने जोर धरला आहे. तसंच, पाऊस पडून गेल्यानंतर उकाडादेखील वाढला आहे. पावसात अवकाळी पावसामुळं शेतीचे अतोनात नुकसान झालं आहे. पुढील ४-५ दिवस राज्यात मुसळधार पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे. पुढील आठवडाभर राज्यात वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. गुजरात आणि उत्तर कोकणच्या किनाऱ्यालगत अरबी समुद्रात चक्राकार वारे वाहत आहेत. याचाच परिणाम म्हणून सध्या राज्यात पावसाला पोषक वातावरण निर्माण झाले आहे. तसंच हवेची द्रोणीय स्थिती निर्माण झाल्याने देशभरातील अनेक राज्यांमध्ये पुढील ४-५ दिवस अवकाळी पाऊस होणार आहे. अनेक जिल्ह्यात पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. पावसाच्या या स्थितीमुळं महाराष्ट्रातदेखील मान्सूनचे आगमन लवकर होणार आहे.



राज्यात वादळी पावसाचा इशारा कायम आहे. विदर्भ, मराठवाडा, खानदेश, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात वादळी पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. सातारा, कोल्हापूर, पुणे, नाशिक आणि धुळे जिल्ह्यात काही ठिकाणी विजा आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाचा दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच यावेळी ५०-६० किमी प्रतितास वेगाने वारे वाहतील, असेही हवामान विभागाने सांगितले आहे. अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यात पुढील २ दिवस वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भात काही ठिकाणी पुढील चार पाच दिवस विजा आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मराठवाड्यातही पुढील पाच दिवस वादळी पावसाचा अंदाज आहे.

## पालघरमध्ये रासायनिक कारखान्यात गॅस गळती, दहा कामगारांची प्रकृती बिघडली

**■पालघर । प्रतिनिधी :**

पालघर जिल्ह्यातल्या बोईसरमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका रासायनिक कारखान्यामध्ये निष्काळजीमुळे गॅस गळती झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत दहा पेक्षा अधिक कामगारांची प्रकृती बिघडली आहे. ही दुर्दैवी घटना बोईसच्या तारापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये घडली आहे. विशेष म्हणजे जेव्हा गॅस गळतीमुळे कामगारांची प्रकृती बिघडल्याचं लक्षात आलं तेव्हा या रासायनिक कारखान्याच्या मॅनेजरनं ही घटना दाबवण्याचा प्रयत्न केला असा आरोप होत आहे. या घटनेनंतर कारखान्याच्या व्यवस्थापकानं सर्व मजुरांना दुसऱ्या ठिकाणी हलवलं.



**प्रकृती खालवल्यानंतर केलं रुग्णालयात दाखल**

मिळालेल्या माहितीनुसार हा गॅस इतका विषारी होता की, या गॅसच्या संपर्कात जे मजूर आले, त्यांना तीव्र वेदना होऊ लागल्या, त्यांच्या डोळ्यात आणि नाकात तीव्र जळजळ होऊ लागली, त्यांची प्रकृती खालावली, ते जोरजोरात ओरडून लागले. सुरुवातीला या कारखान्याच्या व्यवस्थापकानं हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला. मात्र कामगारांची प्रकृती बिघडल्यानं त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं, या कामगारांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानं हे प्रकरण समोर आलं आहे.

मात्र जेव्हा कामगारांना तीव्र वेदना होऊ लागल्या, डोळ्यांमध्ये आणि नाकामध्ये तीव्र जळजळ जाणवू लागली, त्यांची प्रकृती खालावली तेव्हा त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं, या कामगारांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रकरण उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी तातडीनं घटनास्थळी धाव घेऊन घटनास्थळाची पाहाणी केली.

धक्कादायक बाब म्हणजे कोणतीही सुरक्षिततेची काळजी न घेता या कारखान्यामध्ये धोकादायक केमिकलचं उत्पादन सुरू होतं. यामुळे पुन्हा एकदा कामगारांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झालं आहे. सध्या या कामगारांची प्रकृती स्थिर असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीनं घटनास्थळी धाव घेऊन, घटनास्थळाची पाहाणी केली. घटनेबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. यामुळे कामगारांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. कोणतीही सुरक्षेची काळजी घेण्यात आली नव्हती अशी माहिती समोर येत आहे.

## तिहेरी हत्याकांडाने मुंबई हादरली

### २ कुटुंबीयांचा एकमेकांवर हल्ला, ३ ठार ४ जखमी

**■मुंबई । प्रतिनिधी :**

मुंबानगरीतील दहिसर पश्चिम एम.एच.बी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गणपत पाटील नगर परिसरात दोन कुटुंबात तुफान हाणामारीची घटना घडली आहे. दोन कुटुंबातील या भांडणात चक्क चाकू आणि कोयताने एकमेकांवर जोरदार हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात तीन जणांचा जागीच मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे. जुन्या वादातून दोन कुटुंबीयांतील मारहाणाच्या घटनेचं गंभीर गुन्ह्यात रुपांतर झालंय. या घटनेत ३ जण जागीच ठार झाले असून ४ जण गंभीर जखमी आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली.

हमीद शेख (वय ४९ वर्षे), रमणलाल गुप्ता (वय ६० वर्ष) आणि अरविंद गुप्ता (वय २३ वर्ष) अशी मृत्यू झालेल्या तिघांची नावे असून हे सर्व गणपत पाटील नगर मधील रहिवाशी आहेत. जुन्या भांडणाचा राग मनात धरून आज दोन्ही बाजूने तुफान राडा झाला होता. याच राड्यामध्ये गणपत पाटील नगर परिसरात असलेला दुकानदारांकडून चाकू आणि कोयता घेऊन दोन्ही बाजूंनी एकमेकांवर हल्ला करण्यात आला. त्यामध्ये, तीन जणांचा जीव गेला असून ४ जण गंभीर जखमी आहेत. जखमींना जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. याप्रकरणी, सध्या एम.एच.बी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू असून परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एम एच बी पोलीस ठाणे गणपत पाटील नगर या झोपडपट्टीमध्ये वास्तव्यास असणाऱ्या शेख व गुप्ता परिवारांमध्ये २०२२ मध्ये क्रॉस गुन्हे दाखल होते. तेव्हापासून त्यांचे वैमनस्य आहे. आज रोजी ४.३० वाजेच्या सुमारास गणपत पाटील नगर गल्ली नंबर १४ चे रस्त्यावर राम नवल गुप्ता याचा नारळ विक्री स्टॉल समोर अमित शेख हा दारू पिऊन आलेवर त्यांचेत वाद सुरु झाले. दोघांनी आपले मुलांना बोलावले. त्यानंतर, गुप्ता त्याची मुले अमर गुप्ता, अरविंद गुप्ता व अमित गुप्ता यांची आणि हमीद नसिरुद्दीन शेख, त्याची मुले अरमान हमीद शेख व हसन हमीद शेख यांच्यामध्ये हाताने व धारदार शस्त्राने मारामारी झाली. सदर मारहाणीमध्ये राम नवल गुप्ता (वडील) व अरविंद गुप्ता हे मयत झाले असून अमर गुप्ता व अमित गुप्ता जखमीआहेत. तसेच हमीद शेख (वडील) हा सुद्धा मयत झाला असून त्याचा मुलगा अरमान शेख व हसन शेख जखमी आहे. शताब्दी हॉस्पिटल येथून मृतदेह ढट करिता पाठवले आहेत. क्रॉस खुनाचे गुन्हे दाखल करन्याचे काम सुरु असून आरोपी जखमी असल्याने अटक बाकी आहे.




## तब्बल १३ कोटी ३७ लाख रुपयांचे ड्रग्ज जप्त...

### ५ जणांना अटक, मुंबईच्या आरसीएफ पोलीसांची मोठी कारवाई

**■बीड । प्रतिनिधी :**

मुंबईच्या आरसीएफ पोलीस ठाण्याने मोठी कारवाई केली आहे. पोलिसांनी तब्बल १३ कोटी ३७ लाख ६० हजार किमतीचे एकूण सहा किलो ६८८ ग्रॅम मेफेड्रोन म्हणजेच एमडी ड्रग्स जप्त केले आहे. याप्रकरणी पाच जणांना पोलिसांनी अटक केली आहे. पोलिस अधिकची चौकशी करत आहेत. दरम्यान, रेहान शेख नावाचा तरुण हा आरसीएफ पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांना एमडी ड्रग्सची विक्री करताना आढळून आला होता. पोलिसांनी त्याला अटक केली असता त्याच्याकडे साडे चार लाखाचे एमडी सापडले होते. त्याच्याकडे कसून तपास केला असता पोलिसांना आणखी चार एमडी विक्रेत्या आरोपींची माहिती मिळाली. त्यांना अटक करून पोलिसांनी या पाचही आरोपींकडून तब्बल तेरा कोटी पेक्षा जास्त किमतीचे एमडी ड्रग्स हस्तगत केले आहे. तसेच ही एक मोठी टोळी असल्याचा संशय पोलिसांना असून पुढील आरोपींचा पोलीस शोध घेत आहे.दरम्यान, १३ कोटी ३७ लाख ६० हजार किमतीचे एकूण सहा किलो ६८८ ग्रॅम मेफेड्रोन म्हणजेच एमडी ड्रग्स नेमके आले कोठून? असा सवाल देखील उपस्थित केला जात आहे. या प्रकरणी पोलिस कसून तपास करत आहेत. याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपींचे कोणाशी कनेक्शन आहे याचा तपासही पोलिस घेत आहेत.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# धारावीकरांचे डम्पिंग नको!

देशाच्या आर्थिक राजधानीत असलेली धारावी झोपडपट्टी ही आशियातली सगळ्यात मोठी झोपडपट्टी म्हणून ओळखली जाते. पुढच्या काही वर्षांमध्ये धारावीची ही बदनामीकारक ओळख पुसली जाण्याची शक्यता आहे. कारण धारावी झोपडपट्टीचा पुनर्विकास होऊ घातलाय. धारावीच्या पुनर्विकासाचे कंत्राट अदानी प्रॉपर्टीजला मिळाले आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्प सुरुवातीपासूनच वादग्रस्त राहिलाय. परंतु, जेव्हापासून अदानी समूहाचे नाव धारावीशी जोडले गेलेय, तेव्हापासून धारावी पुनर्विकास योजनेतील वादही मोठे होऊ लागलेत. धारावीतील रहिवाशांच्या घरांसाठी देवनार कचराभूमी अर्थात डम्पिंग ग्राऊंडची काही जागा दिली जाणार आहे. एकीकडे मुंबईत डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न बिकट होत चाललेला आहे, हायकोटार्ने कांजूरमार्गची जागा वनक्षेत्र घोषित केलीय, मालाड, मुलुंडचे डम्पिंग ग्राऊंड आधीच बंद झालेत, त्यामुळे मुंबईकरांचा रोज हजारो मेट्रिक टन कचरा टाकायचा कुठे असा महापालिकेला प्रश्न पडलाय. त्यातच देवनारची ही जागा अदानीला देण्यावर शिवसेना ठाकरे गटाचे युवा आमदार आदित्य ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. १३२ हेक्टरचा भूखंड असलेल्या देवनार डम्पिंग ग्राऊंडवर मुंबईतील दररोज सुमारे ५ हजार ५०० मेट्रिक टन कचरा टाकला जातो, मात्र भविष्यात यामध्ये ७० ते ११० एकर जागा ही धारावी पुनर्वसन प्रकल्पासाठी तर, काही जागा वीज निर्मितीकरिता वापरण्यात येणार आहे. डम्पिंग ग्राऊंडची ही जागा स्वच्छ करून राहण्यायोग्य करण्याकरिता मुंबई महापालिकेने २३६८ कोटी रुपयांचे टेंडर काढले आहे. ही जागा स्वच्छ झाल्यावर इथे सुमारे ५० हजार धारावीकरांचे पुनर्वसन होणार असल्याचे समजत आहे. या टेंडरला आदित्य ठाकरेंनी विरोध केला असून आधीच्या ४५०० कोटींच्या टेंडरवरून भाजपचे मंत्री आशिष शेलार यांनी ठाकरे गटाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केलाय. हे आरोप-प्रत्यारोप तर सुरूच राहतील. कारण धारावीकरांच्या पुनर्विकासातील असंख्य अडचणींपैकी एकही अडचण सोडवण्यात ना सत्ताधारी, ना विरोधक यापैकी एकालाही रस नाहीय. धारावीकरांच्या नावावर फक्त राजकारण सुरू आहे. मुंबईत नजर टाकाल तिथे पुनर्विकास प्रकल्प सुरू आहेत. त्यामध्ये काही प्रकल्प हे खासगी इमारतींचे तर काही एसआरएचे प्रकल्प आहेत. कुठलाही बांधकाम व्यावसायिक असो अधिकाधिक नफा कमावण्याच्या उद्देशानेच तो पुनर्विकास प्रकल्पांमध्ये हात घालतो. मोक्याची जागा आपल्या ताब्यात ठेवून मूळ रहिवाशांचे पुनर्वसन आड बाजूला करतो. अदानी समूहही काही वेगळा नाही. धारावी पुनर्विकास प्रकल्पा अंतर्गत केंद्र आणि राज्यातले भाजप सरकार धारावीच्या ५५० एकर जागेसह मुंबईतील मोक्याचे २ हजार एकरचे २० भूखंड अदानीला आंदण देणार आहे. त्यात मुलुंडमधील केंद्राच्या मालकीची मिठागरांची ५८ एकरची जागा अदानी समूहाला ३१९ कोटी रुपयांना देण्यात आलीय. शिवाय मुंबई महापालिकेच्या मालकीची जकात नाक्याची १८ एकरपैकी १० एकर, मुलुंड डम्पिंग ग्राऊंडची ४६ एकर आणि आता देवनार डम्पिंग ग्राऊंडची जागा, अशा विविध जागांचा यात समावेश आहे. खुद्द मुलुंडमधील रहिवाशांनी धारावीकरांचे पुनर्वसन आमच्या जागेवर होता कामा नये असा इशारा दिला होता. तेव्हा लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार मिहिर कोटेचा, भाजप नेते किरीट सोमय्या यांनी मुलुंडची एक इंचही जागा धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी देणार नाही, मूळ धारावीकरांना धारावीबाहेर काढणार नाही, असे आश्वासन दिले होते. परंतु, मुलुंडच्या या ५८ एकर मिठागरांच्या जागेवर राज्य सरकारने बॅनर लावून धारावीतील अपात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन येथेच होणार असल्याचे स्पष्ट केले आहे. यावरून केवळ निवडणुकीत मते मिळवण्यासाठी भाजपने ही खोटी आश्वासने दिल्याचेही स्पष्ट झाले आहे. पुनर्वसनाच्या नावाखाली धारावीकरांना मूळ जागेपासून कित्येक किमी दूर शहराबाहेर व डम्पिंग ग्राऊंडच्या हानिकारक जागेवर उचलून टाकण्याचा हा डाव म्हणजे धारावीकरांच्या आयुष्याशीच खेळण्याचा प्रकार आहे. चेंबूरच्या माहुल गावात मुंबई महापालिकेने प्रकल्पबाधितांसाठी शेकडो घरे उभारून ठेवलीय. परंतु माहुलचा हा संपूर्ण परिसर विषारी, प्रदूषणकारी आणि राहण्यास अयोग्य असल्याने येथे कुणीही प्रकल्पबाधित राहायला तयार होत नाही. येथील पुनर्वसनावरून मुंबई उच्च न्यायालयाने महापालिकेला झापले होते. तरी, महापालिका ही पडून असलेली घरे आपल्याच कर्मचार्यांना स्वस्तात विकून त्यांचा जीव धोक्यात टाकतेय. डम्पिंग ग्राऊंडच्या जागेवरील पुनर्वसनही असेच घातक म्हणावे लागेल. धारावीत शेकडो मिनी इंडस्ट्रियल हब आहेत, असंख्य उद्योग, व्यवसाय येथे चालतात. हजारो, लाखो लोकांना त्यामुळे रोजगार मिळतो. कोट्यवधींचे देशी-परदेशी व्यवहार होतात. धारावीतील लोकांना इकडेतिकडे फेकून दिल्यावर हा इंडस्ट्रियल हबही उद्ध्वस्त होणार आहे. आहे तिथेच पुनर्वसन व्हावे या मागणीसाठी काही दिवसांपूर्वी एल्फिन्स्टन ब्रीजच्या प्रकल्पबाधितांनी आंदोलन केले होते. धारावीकरांनी याआधीच एक याचिका न्यायालयात दाखल केली आहे. लवकरच धारावीकर आपल्या विविध मागण्यांसंदर्भात पुन्हा मोर्चा काढण्याची शक्यता आहे. आहे त्याच जागेवर पुनर्वसन करा, एखाद्या कर्चयाप्रमाणे डम्पिंग करू नका, अशीच धारावीकरांची सरकारकडून अपेक्षा आहे. मात्र सरकार या मागणीला सातत्याने केराचीच टोपली दाखवत आहे.

# महाराष्ट्राने स्वतःचा विचार करावा

**स्वातंत्र्य मिळालं तेव्हापासून देशाच्या तिजोरीत महाराष्ट्रानं सर्वाधिक भर घातली. आता तिजोरी रिती आहे. केंद्राकडून महाराष्ट्राला जे मिळतं त्यात आमूलाग्र बदल व्हावा, नाही तर भविष्य अंधारलेलं असेल.**

'महाराष्ट्र जेव्हा विविध करांच्या माध्यमातून एक रुपया दिल्लीच्या तिजोरीत जमा करतो तेव्हा विकासकामासाठी दिल्ली महाराष्ट्राला मोजून पूर्ण आठ पैसे देते, मात्र बिहार जेव्हा केंद्राच्या तिजोरीत एक रुपया टाकतो तेव्हा केंद्र बिहारला त्यांच्या तिजोरीतून चक्क ७ रुपये ६ पैसे देतं.' हे वाक्य एक अहवाल वाचताना नजरेला पडलं. हे वाचल्यावर मनातली पहिली प्रतिक्रिया म्हणजे, केंद्र सरकार राज्या-राज्यांमध्ये असा भेदभाव करणारच नाही. करूच शकणार नाही. मग आणखी अहवाल पाहिले, आकडेवारी पाहिली आणि वाटलं महाराष्ट्रानं गंभीरपणे विचार करायला पाहिजे. हे खरं आहे की देश म्हणून केंद्र सरकारनं अविकसित आणि मागासलेल्या राज्यांना अधिक मदत केली पाहिजे, महाराष्ट्रानं त्याला हातभार लावला पाहिजे, पण एकच प्रश्न मनात येतो की अशी किती मदत करत राहायची? आणि किती वर्षं? कारण, दहा-वीस वर्षं नाही तर गेली किमान ७५ वर्षं तरी हे चालू आहे.

महाराष्ट्र ज्या प्रमाणात केंद्राच्या तिजोरीत भर घालत असतो ते पाहिल्यावर संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळातील प्रसिद्ध कविता आठवली. 'महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले, महाराष्ट्राविना राष्ट्रगाडा न चाले.' पुढची ओळ तर फारच मार्मिक आहे. 'खरा वीर वैरी पराधीनतेचा, महाराष्ट्र आधार हा भारताचा.' साधारण ६५ वर्षांपूर्वीच्या या ओळी आहेत.

आजही महाराष्ट्र केंद्राच्या तिजोरीत सतत भर घालतो आहे. बघा, थेट कर गोळा करण्यात महाराष्ट्राचा क्रमांक कायम पहिला आहे. आजही जीएसटी सगळ्यात जास्त गोळा होतो तो महाराष्ट्रात. सकल राष्ट्रीय उत्पन्नात म्हणजे 'जीडीपी'मध्येही महाराष्ट्राचं योगदान सर्वात अधिक आहे. त्यामुळे निःसंशय महाराष्ट्र हा देशाचा आधारवड आहे; निदान आत्तापर्यंत तरी होता.

अर्थात आज महाराष्ट्राच्या दृष्टीनं परिस्थिती चांगली नाही. शेतकरी आत्महत्यांमध्ये महाराष्ट्राचा क्रमांक पहिला आहे. एके काळचा उद्योगशील महाराष्ट्र आज अडचणीत आहे. शहरं बेसुमार वाढली आहेत. नवा रोजगार निर्माण होताना दिसत नाही. महाराष्ट्रच समस्यांच्या गर्तेत सापडला आहे, मग तरीही महाराष्ट्र केंद्राला देणार रुपया आणि बदल्यात घेणार फक्त ८ पैसे? देशात विविध मार्गानं तिजोरीत कर गोळा होत राहतो. हा गोळा होणारा कर कसा वाटायचा हे ठरवण्याचं काम वित्त आयोगाकडे आहे. दर पाच वर्षांनी या वाटपाचं सूत्र बदलतं. हे सूत्र काय असावं, हे प्रत्येक राज्याला विचारण्यासाठी वित्त आयोगाचे पाच सदस्य राज्या-राज्यांचा दौरा करत आहेत. ते पुढच्या



आठवड्यात महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्र सरकारची बाजू तर ते ऐकणार आहेतच; पण त्याशिवाय इतर राजकीय पक्षांनाही भेटणार आहेत. महाराष्ट्राला आपली बाजू मांडण्याची ही चांगली संधी आहे.

हा १६वा वित्त आयोग आहे आणि २०२६ ते २०३१ या पाच वर्षांत केंद्राकडे जमा झालेल्या कराच्या वाटपाचं सूत्र हे आयोगाचे सदस्य देणार आहेत. प्रमुख तीन प्रकारच्या शिफारशी ते करणार आहेत. एक, केंद्र सरकार स्वतःकडे किती ठेवणार? दोन, केंद्रानं स्वतःचा वाटा काढून घेतल्यावर उरलेल्या हिश्शाची वाटणी राज्यांमध्ये कशी करणार? आणि तीन, राज्यांनी ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा तसेच नगरपालिका, महानगरपालिका यांना निधीचं वाटप कसं करणार?

महाराष्ट्रानं आपली बाजू मांडताना काही महत्त्वाच्या गोष्टी आयोगासमोर ठासून मांडल्याच पाहिजेत, कारण इथून २०३१ पर्यंतचा काळ महाराष्ट्राच्या दृष्टीनं फार महत्त्वाचा आहे. महाराष्ट्राला केंद्राकडून यथायोग्य असा वाटा मिळाला नाही तर कधीही भरून न येणारं नुकसान होईल. म्हणून वित्त आयोगाच्या ह्या भेटीकडे आपण डोळ्यात तेल घालून पाहायला हवं.

**महाराष्ट्रानं आपली बाजू मांडताना खालील गोष्टी मांडल्या पाहिजेत :**

१. देशाच्या स्थापनेपासून केंद्राच्या तिजोरीत भर घालणारं प्रथम क्रमांकाचं राज्य महाराष्ट्र आहे. परंतु, आता परिस्थिती वेगळी आहे. सर्वांत जास्त उत्पन्नाचं राज्य म्हणून वित्त आयोगाच्या सूत्रात महाराष्ट्राला कमी वाटा देण्याचा विचार कदाचित होऊ शकेल. परंतु एक लक्षात घेतलं पाहिजे, की सगळा महाराष्ट्र विकासाच्या सारख्याच टप्प्यावर नाही. मुंबई आणि नंदुरबार एकाच पातळीवर नाही. महाराष्ट्राचा काही भाग खूप विकसित असला तरी महाराष्ट्रात अंतर्गत असमतोल मोठा आहे. मराठवाडा, विदर्भ ह्यातील दुर्गम भाग हा बिहार, उत्तर प्रदेश यांच्यासारखाच आहे. मुंबई-पुण्याकडे पाहून निधीवाटप झालं तर त्या भागावर फार अन्याय होईल. विकसित राज्य म्हणून वित्त आयोगाच्या सूत्रात ४५ टक्के वजन दिलं आहे ते कमी करून ३० टक्के करायला हवं . २. गेल्या ७५ वर्षांत मागासलेल्या राज्यांना केंद्रानं अधिकचा निधी दिला कारण तिथे विकास व्हावा, ही त्यामागची कल्पना. परंतु इतकी वर्षं निधीचा पाऊस पाडूनही त्या राज्यांमधून रोजगारासाठी परप्रांतीयांचे लोंढे महाराष्ट्रात येत आहेतच. त्यामुळे महाराष्ट्राच्या शहरी भागातील संसाधनांवर ताण येतो आहे. महाराष्ट्राचं दोन्ही बाजूंनी मरण होतंय.

३. महाराष्ट्र हे सर्वाधिक शहरीकरण झालेलं राज्य आहे. शहरं संपत्ती निर्माण करतात आणि देशाच्या तिजोरीत भर घालतात. मग अशा शहरांची देखभाल करणे, तिथे संसाधनं उभी करणे यासाठी वित्त आयोगानं शहरीकरणाच्या प्रमाणाचाही विचार केला पाहिजे.

४. मागच्या वित्त आयोगाच्या सूत्रानुसार केंद्र सरकारनं स्वतःकडे ५९ टक्के रक्कम ठेवली होती. नंतर त्यातही वाढ करून ती ६० टक्के करण्यात आली. केंद्रानं तिजोरीतली ५० टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम स्वतःकडे ठेवू नये. संविधानानं दिलेली चौकट पाहिली तर राज्यं आणि त्यानंतरचा स्तर म्हणजे पंचायत राज संस्था ही विकासाची इंजिनं आहेत. त्यांना अधिक उत्तेजन द्या. सगळ्या गोष्टी केंद्राच्या आदेशानुसार न करता त्या विकेंद्रित करा. तसं करायचं तर सर्वाधिक पैसा केंद्राकडे ठेवण्याची गरज नाही.

५. जगात ज्या काही फार मोठ्या शहरी व्यवस्था उभ्या आहेत त्यातल्या काही महाराष्ट्रात आहेत. वित्त आयोग जेव्हा राज्यांनंतरच्या पंचायत किंवा महानगरपालिकांच्या वित्तीय व्यवस्थेचा विचार करील तेव्हा मुंबई, पुणे अशांसारख्या विशाल शहरी व्यवस्थांचा विचार एखाद्या साध्या महानगरपालिकेसारखा करून चालणार नाही. वेगळ्या पद्धतीनं केला पाहिजे. आजवरच्या वित्त आयोगांनी केला नाही, पण या वित्त आयोगांनी महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, संभाजीनगर आणि नाशिक या महाकाय शहरांचा संपूर्णपणे वेगळा विचार करून तसा निधी महाराष्ट्राला दिला पाहिजे.

६. केंद्र सरकार मोठ्या प्रमाणात उपकर आणि अधिभार लावत आहे. गेल्या काही वर्षांत याचं प्रमाणही वाढलं आहे. वित्त आयोगाच्या निर्देशानुसार या रकमेचं सर्वांमध्ये वाटप न होता तो पैसा सरळ केंद्राच्या खात्यात जातो आहे. हे बदललं पाहिजे. उपकर आणि अधिभार ह्यामधून जमा होत असलेल्या रकमेतही राज्यांचा वाटा असला पाहिजे.

अगदी स्वातंत्र्य मिळाल्यापासून महाराष्ट्रानं कायम देशाचा विचार केला. या वेळी महाराष्ट्रानं कच खाऊ नये. पुढची पाच वर्षं निर्णायक आहेत. महाराष्ट्राच्या प्रगतीची ट्रॅजेक्टरी किंवा मार्गक्रमणा ठरवणारी आहेत. सरकारनं तर आपली बाजू नीट मांडावीच परंतु, इतर राजकीय पक्षांनीही जागृत असावं, इथल्या समाजानं सावध असावं, नागरी समाज, सामाजिक संस्था ह्यांनीही दक्ष असावं. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनीही मागण्या करताना आणि नंतर वित्त आयोगाच्या शिफारशी स्वीकारताना आपल्याला काय मिळालं आणि काय नाही हे पारदर्शकपणे महाराष्ट्रासमोर ठेवावं.

महाराष्ट्रा, जागा राहा, दिवस कठीण आहेत!

## नैर्ऋत्येचे शुभवर्तमान

देशात यंदा सामान्य ते सरासरीहून अधिक पावसाचा हवामानशास्त्र विभागाचा (आयएमडी) अंदाज उत्साहवर्धक असून, दर वर्षीच्या नियोजित वेळेपेक्षा आधीच तो अंदमान-निकोबारमध्ये दाखल झाल्याचे शुभवर्तमानही विभागाने दिले आहे. पूर्वी देण्यात आलेल्या प्राथमिक अंदाजानुसार यंदा 'एल निनो'चा प्रभाव जाणवण्याची शक्यता नसल्यामुळे गेल्या वर्षीप्रमाणेच यंदाचा मान्सूनही शेती आणि अर्थव्यवस्थेला गती देणारा ठरेल, अशी आशा करण्यास हरकत नाही. दर वर्षी साधारण २२ मेच्या सुमारास अंदमान-निकोबार बेटांवर मान्सून दाखल होतो; तो यंदा नऊ दिवस आधीच दाखल झाला. मान्सूनचा पुढील प्रवास सुरळीत झाला, तर केरळमध्ये एक जूनच्या सुमारास तो दाखल होईल आणि महाराष्ट्रासह उर्वरीत देशभरात वेळापत्रकानुसार पावसाला सुरुवात होऊ शकते. यंदा जून ते सप्टेंबर, म्हणजे पावसाळ्याच्या महिन्यांमध्ये सामान्य (९६ ते १०४ टक्के) ते सरासरीहून अधिक (१०४ ते ११० टक्के) पावसाचा अंदाज 'आयएमडी'ने वर्तवला असून, वायव्य, मध्य आणि ईशान्य भारताचा काही भाग वगळता त्याचे प्रमाण अधिक राहण्याची शक्यता आहे. केरळमध्ये लवकर किंवा विलंबाने मान्सून दाखल झाला, तरी त्याच्या पुढील वाटचालीवर परिणाम होण्याची फारशी शक्यता नसल्याचे 'आयएमडी'चे मत आहे. महाराष्ट्रात कोकणची किनारपट्टी, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांमध्ये सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज आहे. गेल्या काही काळात मान्सूनचे प्रमाण सर्वसाधारण राहिले असले, तरी त्याचे असमान वितरण हा मुद्दा दुर्लक्षून चालणार नाही. काही वर्षे मान्सून नियोजित वेळेपेक्षा उशिराने दाखल होतो किंवा दाखल झाल्यानंतर त्यामध्ये मोठा खंड पडतो; तसेच अत्यंत कमी वेळात प्रचंड पाऊस पडणे किंवा मध्ये बरेच दिवस उघडीप देण्यामुळे कागदोपत्री मान्सूनची सरासरी गाठली किंवा ओलांडली, तरी त्याची फळे योग्य प्रमाणात मिळत नाहीत, असा अनुभव आहे. पावसाला विलंब झाला, तर खरिपाच्या पेरण्या रखडतात, किंवा झालेल्या पेरण्याही पावसाअभावी वाया जाऊन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते; तसेच जूनमध्ये हजेरी लावल्यानंतर जुलैअखेर किंवा ऑगस्टपर्यंत पाऊस ओढ देत असल्याने धरणांतील पाणीसाठेही आटतात आणि अनेक शहरांमध्ये पिण्याच्या पाण्याचीही टंचाई निर्माण होते. या बदलत्या ह्यपॅटर्नह्चा अभ्यास करून सरकारने नियोजनात काही बदल करणेही अपेक्षित आहे. गेल्या काही दिवसांत अवकाळी पावसाने राज्यात काही भागांमध्ये दाणादाण उडवून दिली आहे. विशेषतः मराठवाड्यात या पावसाने आठ जणांचा बळी घेतला; तसेच फळपिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. येत्या शनिवारपर्यंत विविध भागांमध्ये पावसाची शक्यता असून त्या दृष्टीने खबरदारी घेण्याची गरज आहे. गेल्या काही काळात हवामानबदलाचे परिणाम प्रकर्षाने जाणवत असून त्या दृष्टीने संशोधन आणि नियोजनाला गती देणे, ही काळाची गरज बनली आहे. गेल्या तीन वर्षांपैकी २०२३ वगळता पावसाचे प्रमाण देशात सरासरीपेक्षा अधिक राहिले. त्यामुळे अन्य जागतिक आव्हानांच्या तुलनेतही शेतीने देशाच्या सकल उत्पन्नात (जीडीपी) १७ ते १८ टक्के योगदान दिले आहे. तसेच उत्पादनक्षेत्राची वाढ काहीशी मंदावलेली दिसत असताना शेतीने मात्र चार टक्के वाढीचा दर कायम ठेवला. यामध्ये आणखी वाढ होण्याच्या प्रक्रियेत मान्सून हा महत्त्वाचा घटक आहे. त्या दृष्टीने सरासरीपेक्षा अधिक पावसाने शेती उत्पादनात वाढ होण्याची आशा आहे. त्यातून अन्नधान्याचा पुरवठा समाधानकारक राहू शकतो.

# असुरक्षिततेकडून सन्मानाकडे...

**भारतात असंघटित क्षेत्र हा अर्थव्यवस्थेचा एक अत्यंत मोठा भाग आहे. अंदाजे ९० टक्के कामकाज या क्षेत्रात होते, जिथे सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही आणि करप्रणालीचे पालन केले जात नाही. त्यामुळे, हे क्षेत्र बऱ्याच अंशी दुर्लक्षित आणि अनियंत्रित आहे. कुठेही नोंदणी नसलेल्या या कामगार वर्गाचे भारतीय अर्थव्यवस्थेत मोठे योगदान आहे. यामधली महिलांची अचूक संख्या सांगणे जिकिरीचे असले तरी २०१८ साली आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवालानुसार भारतात एकूण कामगार महिलांमधील सुमारे ८० टक्के महिला या असंघटित क्षेत्रांत काम करतात, यावरून महिलांच्या असंघटित क्षेत्रातील संख्येचा अंदाज यावा.**

असंघटित क्षेत्रामध्ये घरगुती कामगार, रस्त्यावर विक्री करणाऱ्या महिला, शेती कामगार, लघु उद्योग करणाऱ्या तसेच कचरावेचक अशा अनेक महिला येतात. प्रामुख्याने ज्या महिलांना स्वतःला कौशल्य वाढवण्यासाठी आणि चांगली आर्थिक संधी मिळवण्यासाठी योग्य संसाधने उपलब्ध नाहीत, अशा महिला असंघटित क्षेत्रांच्या खाईत लोटल्या जातात. त्यांचे काम हे श्रमप्रधान असल्याने त्याला फारशी सामाजिक मान्यता मिळत नाही. कामाचे दीर्घ तास, अत्यल्प मोबदला, कोणतीही पूर्वसूचना न देता सहजपणे काढून टाकण्याची सोय आणि कोणतेही सामाजिक संरक्षण नसणे, ही या क्षेत्रातील महिलांची कायमची परिस्थिती आहे. काम सारखे असले तरीही आपल्या पुरुष सहकाऱ्यापेक्षा कमी वेतन हा असंघटित क्षेत्रातील महिलांवर परिणाम करणारा आणखी एक घटक आहे.

या आर्थिक असमानतेमुळे गरिबीचे चक्र कायम राहते. गरिबी आणि तक्रार निवारण्यासाठी कोणत्याही भक्कम व्यवस्थेच्या अभावाखातर या महिला मानसिक आणि शारीरिक शोषणाच्या सहजपणे बळी ठरतात. घरकाम करताना होणारे चोरटे स्पर्श, बांधकामाच्या ठिकाणी वापरलेले आक्षेपार्ह शब्द किंवा थेट केलेली शारीरिक सुखाची मागणी या सगळ्या सामाजिक, आर्थिक आणि संरचनात्मक असुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर, कामाच्या ठिकाणी महिलांच्या सन्मान व सुरक्षिततेची हमी देणारा ह्यकामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा, २०१३' (पॉश कायदा) विशेष महत्त्वाचा ठरतो. विशेषतः असंघटित क्षेत्रातील महिलांसाठी, जिथे कोणताही औपचारिक करार, तक्रारीचं व्यासपीठ किंवा संरक्षक व्यवस्था नसते, तिथे हा कायदा त्यांचं एकमेव कायदेशीर कवच आहे.

या कायद्याचा उद्देश कोणत्याही महिलेला, मग ती कोणत्याही पदावर कार्यरत असो किंवा कोणत्याही स्वरूपाच्या कामात गुंतलेली असो, तिच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि भयमुक्त वातावरण मिळवून देणं हे आहे. या कायद्याचा पाया भंवरीदेवी या गाजलेल्या प्रकरणाने घातला. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने १९९७ मध्ये 'विशाखा मार्गदर्शक तत्त्वे' जाहीर केली. या तत्त्वांमधून महिलांना कामाच्या ठिकाणी सुरक्षितता मिळावी यासाठी उपाययोजना सुचवण्यात आल्या, मात्र असंघटित क्षेत्रातील महिलांच्या विशिष्ट गरजांकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. यामुळे असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांनाही योग्य संरक्षण मिळावे, यासाठी स्वतंत्र आणि स्पष्ट कायदेशीर चौकट उभारण्याची गरज निर्माण झाली. याच पार्श्वभूमीवर, विशाखा मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित असूनही अधिक व्यापक आणि समावेशक अशा 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध, प्रतिकार आणि निवारण कायदा, २०१३' (पॉश) ची निर्मिती झाली.



या कायद्यात प्रथमच औपचारिक संस्थांबरोबरच असंघटित क्षेत्रांत काम करणाऱ्या महिलांसाठीही विशेष तरतुदी करण्यात आल्या. या कायद्याअंतर्गत, प्रत्येक कार्यालयाने, जिथे दहा किंवा अधिक कर्मचारी आहेत, त्याठिकाणी 'अंतर्गत तक्रार समिती' स्थापन करणं बंधनकारक आहे. मात्र ज्या ठिकाणी औपचारिक संस्था नाही, मग ती घरगुती कामगार असो, शेतमजूर असो किंवा रस्त्यावर विक्रेता असो, तिला लैंगिक छळाच्या प्रसंगी न्याय मिळवण्यासाठी एक अधिकृत मंच उपलब्ध होईल, या हेतूने त्या ठिकाणी 'जिल्हास्तरीय स्थानिक तक्रार समित्या' (लोकल कंप्लेंट्स कमिटी) स्थापण्याचा निर्णय घेण्यात आला. या समितीचे उद्दिष्ट म्हणजे लैंगिक छळाच्या तक्रारींचे तातडीने, पारदर्शक आणि निष्पक्ष निवारण करणं. तीन वर्षांचा कार्यकाळ असलेल्या समितीमध्ये महिला सदस्यांची संख्या अधिक असावी, तसंच स्वतंत्र सदस्याची नियुक्ती करून तक्रार करणाऱ्या महिलेला सुरक्षिततेची हमी दिली जावी, अशीही अट आहे.

पण प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना या कायद्याच्या अस्तित्वाची माहिती नसते. ज्या काही महिला अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचा प्रयत्न करतात, त्यांनाही सामाजिक दबाव, बदनामी होण्याची भीती, नोकरी गमावण्याचा धोका किंवा कुटुंबाच्या मदतीचा अभाव या कारणांमुळे आपली तक्रार मागे घ्यावी लागते. विशेषतः घरगुती मदतनीस म्हणून काम करणाऱ्या महिला, ज्या एकट्याने घराघरात काम करतात, किंवा फेरीवाल्या महिला, ज्या सार्वजनिक जागी असुरक्षिततेच्या स्थितीत असतात, त्यांच्यासाठी हे वातावरण अधिकच जोखमीचं ठरतं.

जिथे दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यक्ती कामासाठी एकत्र येतात, त्या प्रत्येक ठिकाणी हा कायदा लागू होतो. त्यामुळे घरगुती मदतनीस, शेतमजूर, बांधकाम कामगार, रस्त्यावर विक्री करणाऱ्या महिला सर्वांनाच या कायद्याने संरक्षण आहे.त्यामुळे, पॉश कायद्याची प्रभावी अंमलबजावणी ही केवळ कायद्याच्या कागदी अस्तित्वापुरती मर्यादित न राहता, प्रत्यक्षात त्याचा उपयोग होण्यासाठी जागरूकतेची चळवळ उभारणं काळाची गरज आहे. यासाठी काही ठोस उपाययोजना जाणीवपूर्वक राबवणं आवश्यक आहे.

त्यातले पहिले आणि महत्त्वाचे म्हणजे असंघटित कामगार महिलांपर्यंत ही माहिती पोहोचवणे. त्यांच्यामध्ये विविध माध्यमांद्वारे जागृती निर्माण करणे.त्यामध्ये गावोगावी, वस्त्यांमध्ये, बांधकाम साइट्सवर, बाजारपेठांमध्ये, आणि शेतांमध्ये पॉश कायद्याविषयी माहिती देणाऱ्या जनजागृती मोहिमा, कार्यक्रम, चर्चासत्रं इत्यादी आयोजित करणे. स्थानिक पंचायत, महापालिका, स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्याने मोफत प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा आयोजित करून पॉश कायदा समजावणं, महिलांच्या हक्कांबाबत त्यांना जागरूक करणं आणि तक्रार कशी, किती दिवसांत व कोणाकडे करायची याचे प्रशिक्षण देणे, जिल्हास्तरीय स्थानिक तक्रार समितीच्या संपर्क क्रमांकांचा प्रसार, बैठका, हेल्पलाइन सेवा इत्यादी सुविधा सुविधा बळकट करणे व महिलांपर्यंत पोहचविणे आवश्यक आहे; तसेच लैंगिक छळाविरुद्ध तक्रार करणाऱ्या वा आवाज उठविणाऱ्या महिलांना मानसिक आधार, समुपदेशन, आणि कायदेशीर मदत सहज उपलब्ध करून देणे हे देखील यादृष्टीने टाकलेले महत्त्वाचे पाऊल ठरेल.

आपण 'पॉश'चा पुनर्विचार करायला हवा, तो केवळ कायदा म्हणून नव्हे, तर 'कामगार म्हणून स्त्रियांच्या सन्मानाची खात्री' म्हणून. कारण प्रत्येक स्त्री, ती कोणत्याही वगार्तील, जातीय, आर्थिक पार्श्वभूमीची असो, तिच्या श्रमाचा, तिच्या अस्तित्वाचा, तिच्या आवाजाचा सन्मान होणं हीच खरी 'कामाची सुरक्षितता' आहे. यासाठी केवळ कायदे नाहीत, तर स्थानिक स्तरावर महिला कामगारांचे संघटन, प्रशिक्षण, सामुदायिक चर्चा, आणि पुरुष सहकाऱ्यांचे भान वाढवणं ही पावलं महत्त्वाची आहेत. स्त्रियांना कामाच्या ठिकाणी सन्मानित वाटणं म्हणजे फक्त तक्रार नोंदवण्याचा अधिकार नव्हे, तर 'माझा आवाज, माझं काम, आणि माझं अस्तित्व या व्यवस्थेत महत्त्वाचं आहे,' ही भावना ज्या दिवशी त्यांच्यात रुजेल, त्यादिवशी खऱ्या अर्थाने या व्यवस्थेत त्या सन्मानाने जगू शकतील.

# तालिबानशी संवाद



भारत आणि अफगाणिस्तान यांच्या परराष्ट्रमंत्र्यांमध्ये झालेला संवाद अनेक अर्थांनी महत्त्वाचा आहे. अफगाणिस्तानातील तालिबानी राजवटीला भारताने मान्यता दिलेली नसली, तरी नवी दिल्लीचा तालिबानबाबतचा दृष्टिकोन बदलतो आहे. या वर्षाच्या सुरुवातीला परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी दुबई येथे अफगाणिस्तानचे हंगामी परराष्ट्रमंत्री आमिर खान मुत्ताकी यांची भेट घेतली होती. त्यानंतर आता परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी मुत्ताकी यांच्याशी संवाद साधला.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर अफगाणिस्तान भारताच्या बाजूने उभा राहिला होता, हा ताजा संदर्भ या संवादाला आहे. अमेरिकेने २०२१नंतर अफगाणिस्तानातून काढता पाय घेतल्यानंतर तिथे सत्तेवर आलेल्या तालिबानींवर नियंत्रण मिळविण्याची खेळी पाकिस्तानने खेळली होती; परंतु झाले उलटेच. अमेरिकेच्या दहशतवादविरोधी युद्धात पाकिस्तानने आपल्याशी दगाफटका केल्याचे लक्षात आल्याने तालिबानींनी पाकिस्तानच्या विरोधात भूमिका घेतली. इतकेच नव्हे, तर पाकिस्तानातील तालिबानींना आश्रय देण्यापासून बळ देण्यापर्यंतचे पाऊल उचलले. यामुळे पाकिस्तानच्या पश्चिम म्हणजे अफगाणिस्तानला लागून असलेल्या सीमेवरही संघर्ष निर्माण झाला. अफगाणिस्तानातील तालिबानींवर दबाव टाकण्यासाठी पाकिस्तानने आपल्या देशात आश्रयाला असलेल्या अफगाण निर्वासितांना परत पाठविण्यास सुरुवात केल्याने दोन्ही देशांतील तणाव आणखी वाढला. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर अफगाणिस्तानने भारताची बाजू उचलून धरली.

भारताने अफगाणिस्तानवर क्षेपणास्त्र हल्ले केल्याच्या अफवा उठवून पाकिस्तानने दोन्ही देशांत अविश्वास निर्माण करण्याचा केलेला प्रयत्न फोल ठरला. जयशंकर आणि मुत्ताकी यांच्यातील संभाषणाला ही पार्श्वभूमी आहे. तालिबानींचे महिलांबाबतचे धोरण पूर्णपणे चुकीचे आहे. मात्र, अफगाणिस्तानात ते सत्तेवर आहेत ही वस्तुस्थिती असून, त्यांच्याशी किमान पातळीवरील राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याचा दृष्टिकोन जगभर मांडला जात आहे. भारताने अफगाणिस्तानबरोबरील संबंध दृढ केल्यास पाकसमोरील पर्याय मर्यादित होतात. अफगाणिस्तानात आपल्याला अनुकूल सरकार असावे, यासाठी पाकिस्तान सतत प्रयत्नशील राहिला आहे.

नव्वदच्या दशकातील पहिल्या राजवटीत पाकिस्तानला अनुकूल अशी स्थिती निर्माण झाली होती. भारतविरोधी दहशतवादी कारवायांसाठी पाकिस्तानने अफगाणिस्तानातील तालिबानींचा वापरही केला होता. मात्र, आता बदललेल्या परिस्थितीत तालिबानी पाकिस्तानच्या विरोधात गेले आहेत. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील वाढती नजीकता पाकिस्तानची कोंडी करण्यासाठी म्हणूनच महत्त्वाची ठरते.

## स्पेशल पुदिना राईस

**साहित्य :** २ वाटी तांदूळ, २ वाटी पुदिन्याचे पाने निवडून व धुऊन, फोडणीसाठी तमालपत्र, जिरे, पाच ते सहा लसूण पाकळ्या, अंदाजे मीठ, लाल मिरची फोडणीसाठी.

**कृती :** पुदिना व लसूण पेस्ट बनवून घ्या. तांदळाचा मोकळा भात शिजवून



थंड होऊ द्या. पुलाव मसाला लहान १ चमचा, गरम पॅनमध्ये तेल, जिरे, तमालपत्र व मिरची घालून फोडणी द्या. त्यावर वाटलेला पुदिना घाला व परत पुलाव मसाला घाला. चांगले परतून शिजवलेला भात घाला. मीठ घाला, परतून वाफ येऊ द्या. खोबऱ्याचा किस व पुदिना पाने लावून सजवा व खायला वाढा. यामध्ये मिक्स पालक थोडी वाफवून व वाटून आपण घालू शकता.

## शाम्पूच्या वापरामुळे केसगळतीची समस्या वाढते का?

**कधीकधी अचानक केस खूप गळत असल्याचे तुमच्या लक्षात येते.केस गळण्याचे कारण शोधताना मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. सर्वसाधारणपणे आपण रोज केस स्वच्छ धुण्यासाठी शाम्पूचा वापर करतो. त्यामुळे आपण वापरत असलेल्या शाम्पूमुळे तर केस गळत नाहीत ना? किंवा कोणता शाम्पू आपल्या केसांसाठी योग्य असू शकतो? हे प्रश्न आपल्याला पडू शकतात.**



केस गळणे ही अनेकांना भेडसावणारी एक गंभीर समस्या आहे. मात्र केस गळण्याची कारणे प्रत्येक व्यक्तीमध्ये निरनिराळी असू शकतात. डॉ. अपूर्वा शाह यांनी त्यांच्या 'हॅव अ ग्रेट हेअर डे' या पुस्तकामध्ये शाम्पू केल्यामुळे केस गळत नाहीत किंवा तेलांमुळे केसांच्या त्वचेतील मुळे बंद होत नाहीत, असे मत मांडले आहे. त्याचप्रमाणे हेअर एक्सपर्ट जावेद हबीब यांनी देखील त्यांच्या 'हेअर योगा' या पुस्तकामध्ये शाम्पूच्या वापरामुळे केस गळत नाहीत, या सत्याचा उलगडा केला आहे.

अयोग्य शाम्पू वापरल्यामुळे मात्र तुमच्या केसांची मुळे नक्कीच कमजोर होऊ शकतात. त्यामुळे बरेच दिवस तुमचे केस गळत राहतात व केसांचे खूप नुकसान होते. यासाठी तुमच्या केसांच्या प्रकारानुसार योग्य शाम्पूचा वापर करणे गरजेचे आहे.

### योग्य शाम्पू कसा निवडाल?

तुमच्या केसांचा प्रकार ओळखून योग्य शाम्पूची निवड करा. बाजारात अनेक ब्रॅण्डचे शाम्पू उपलब्ध असले तरी त्यातून तुमच्यासाठी योग्य प्रकारच्याच शाम्पूची निवड करा. त्याचप्रमाणे दर ४ ते ५ आठवड्यांनी तुमच्या शाम्पूचा ब्रॅण्ड बदला. सतत एकाच ब्रॅण्डचा शाम्पू वापरल्यामुळे तुमच्या केसांमधील त्वचेवर त्याचा दुष्परिणाम होतो व तुम्हाला हवा तसा योग्य बदल दिसून येत नाहीत.



**योग्य शाम्पूची निवड करण्यासाठी आधी तुमच्या केसांचा प्रकार ओळखा –**

- **ऑईली हेअर –** काही दिवस केसांमधील त्वचा तेलकट असते, पण केसांची शेवटची टोके कोरडी असतात.
- **ड्राय हेअर –** केस खरखरीत असतात, जे लवकर गुंततात व कुरळे किंवा फ्रिजी असतात.
- **नॉर्मल हेअर –** केसांचा पोत अति कोरडा अथवा अति तेलकटही नसतो.
- **डॅमेज हेअर –** या केसांमध्ये कोंडा किंवा केस दुभंगण्याची (स्प्लीट एण्ड) समस्या असते.
- **लीम्प हेअर –** केस सपाट असतात, ज्यांचा व्हॉल्युम जास्त नसतो किंवा केस फुललेले नसतात.

## अ‍ॅल्युमिनियम फॉईलमध्ये पदार्थ का शिजवू नयेत?

**जर** तुम्ही दररोज जेवणासाठी अ‍ॅल्युमिनियम फॉईलचा वापर करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे.

नुकत्याच करण्यात आलेल्या संशोधनातून असे समोर आले आहे की अ‍ॅल्युमिनियम फॉईलमध्ये शिजवलेले अथवा गुंडाळलेले पदार्थ खाल्ल्याने शरीरावर परिणाम होतो.

जेव्हा अ‍ॅल्युमिनियम फॉईलमध्ये अन्न शिजवले जाते, त्यावेळी मोठ्या प्रमाणात अ‍ॅल्युमिनियम अन्नात मिसळते आणि हे अन्न खाल्ल्याने ते शरीरात जाते. यामुळे हाडांचे आजार तसेच ब्रेन सेल्सची वाढ कमी होण्याची शक्यता असते.



## आवळा सरबत प्या, हे १० आजार टाळा

**आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी आवळा उत्तम आहे. आवळा सरबत घेतल्याने आपल्याला अनेक फायदे होतात. आपले आरोग्य चांगले राहते. आयुष्य वाढण्यास मदत होते. आयुर्वेदातही आवळ्याला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. आवळा सरबतात मध मिसळले तर अधिक चांगले. तसेच आवळा ज्यूसमुळे महिलांच्या पाळीची समस्या दूर होण्यास मदत होते.**



- आवळा ज्यूस आणि मध एकत्र करून प्यायल्याने दम्याचा प्रभाव कमी होतो.
- रक्त शुद्ध करण्यासाठी आवळा सरबत आणि मध खूप गुणकारी आहे.
- आवळा सरबत नियमित घेतल्यास कोलेस्ट्रॉल कमी होते. त्यामुळे हृदयरोगाचा धोका टळण्यास मदत होते.
- आवळा खाण्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. कारण मेटाबॉलिजम व्यवस्थित होऊन वजन कमी होते.
- आवळा हा पाचक आहे. त्यामुळे पचन व्यवस्था व्यवस्थित राहते.
- आवळा सरबत प्यायल्याने चेहऱ्याला ग्लो येतो. तसेच त्वचारोग दूर होण्यास मदत होते.
- लघवीचा ज्यांना त्रास आहे, त्यांच्यासाठी आवळा सरबत चांगले. सरबत प्यायल्याने लघवीसंबंधीचे आजार दूर होतात.
- ज्यांना किडनी स्टोनचा आजार आहे, त्यांच्यासाठी आवळा सरबत चांगले. मूतखड्याचा आजार दूर होण्यास मदत होते.
- आवळ्यामुळे मधुमेह (Disbetes) नियंत्रणात राहण्यास मदत होते.
- सतत तोंड येत असेल तर आवळा सरबत प्यायल्याने ही समस्या दूर होते. तसेच डोळ्यांची शक्ती वाढण्यास मदत होते.

## फोनमध्येच भारी फोटो कसे काढाल? 'या' सोप्या टीप्स करा फॉलो

**आजकाल आपण कुठेही फिरायला गेलो तर तिथे सर्वात जास्त कोणतं काम करत असू तर ते फोटोग्राफी. म्हणजे प्रत्येक गोष्टीचे फोटो काढून ते सोशल मीडियावर आपण अपलोड करतच असतो. त्यात आता ते दिवस गेले जेव्हा लोक त्यांच्या आठवणी टिपण्यासाठी अर्थात फोटो काढण्यासढी मोठमोठे कॅमेरे वापरत होते. आता यासाठी बहुतेक जण मोबाईल फोनच वापरतात. तसेच, स्मार्टफोन कॅमेरे देखील दिवसेंदिवस सुधारत असताना, त्यापैकी बरेच जण जवळजवळ डीएसएलआरसारखे फोटो देतात.तर आज आम्ही तुम्हाला मोबाईल फोटोग्राफीच्या अशाच काही टीप्स आणि युक्त्या सांगणार आहोत, ज्याच्या मदतीने तुम्ही स्वस्त स्मार्टफोनमध्येही कॅमेऱ्यासारखे भारी फोटो काढू शकता.**

**स्मार्टफोनचा कॅमेरा कसा आहे ते आधी समजून घ्या**

स्मार्टफोन वापरून चांगले फोटो कॅप्चर करण्यासाठी सर्वात आधी तुम्हाला तुमच्या फोनचा कॅमेरा कसा आहे म्हणजेच त्याची क्षमता किती आहे ते जाणून घेणं गरजेचं आहे. कारण फोनचं कॅमेरा सेटअप जसं असेल त्यानुसारच फोटो येणार आहेत. पण आम्ही सांगणाऱ्या टीप्समुळे तुम्ही तुमच्या फोनच्या कॅमेऱ्याचा पुरेपुर वापर करून फोटो क्लिक करू शकता. आजकाल बहुतेक आधुनिक फोन अनेक लेन्स सेटअपसह येतात जे वापरकर्त्यांना अल्ट्रा–वाइड अँगल लेन्स, टेलीफोटो लेन्स, डेडिकेटेड पोर्ट्रेट लेन्स, मॅक्रो लेन्स हे सर्व ऑफर करतात. या सर्वांच्या मदतीने तर फोटोज आणखीच भारी येतात.

**फोटो काढताना फ्रेमवर खास लक्ष द्या**

तुम्ही कोणत्याही वस्तूचा किंवा व्यक्तीचा फोटो घेत असाल तर तो पूर्णपणे फ्रेममध्ये योग्यरीत्या असेल हे लक्षात ठेवा. म्हणजेच ऑब्जेक्ट फ्रेममध्ये चांगला आला पाहिजे आणि अंतरही अधिक नसावं. तसंच कॅमेऱ्याची उंची योग्यरीत्या सेट करून परफेक्ट फ्रेममध्ये फोटो काढावा.

**तुमची लेन्स स्वच्छ करा**


ही एक अत्यंत सोपी ट्रिक असली तरी नक्कीच प्रभावी अशी ट्रिक आहे. कारण स्मार्टफोनच्या कॅमेरा लेन्स दिसतात, त्याहूनही अधिक घाण असतात. त्यामुळे त्या पूर्णपणे स्वच्छ केल्याने तुम्हाला चांगले आणि डिटेल्ड फोटो मिळण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे फोटो काढण्यापूर्वी स्मार्टफोनच्या कॅमेऱ्याची लेन्स नीट साफ करावी. कायमच लेन्सची काळजी घेणं फायद्याचं आहे.

**दोन्ही हात वापरा**

चांगला फोटो काढण्यासाठी नेहमी दोन हात वापरा, जेणेकरून तुमची फोनवरील पकड चांगली होईल आणि तुम्ही ऑब्जेक्ट आरामात कॅप्चर करू शकता. फोनवरील पकड चांगली असल्याने फोटो घेताना फोन हलणार नाही, ज्यामुळे फोटोही ब्लर किंवा चुकीच्या अँगल, फ्रेममध्ये येणार नाही. त्यामुळे दोन्ही हातांचा वापर करून फोटो काढणे, ही एक भारी ट्रिक आहे.

**अतिरिक्त प्रॉडक्ट्स वापरा**

डीएसएलआर कॅमेऱ्यांप्रमाणे, फोनसाठीही अतिरिक्त प्रॉडक्ट्स उपलब्ध आहेत. जसं की, ट्रायपॉड, रिंग लाइट आणि अतिरिक्त लेन्स अशा विविध प्रॉडक्ट्सचा शक्य असल्यास वापर करावा. या सर्व उपकरणांच्या मदतीने फोटो अधिक भारी येतील. ट्रायपॉडने फोटो स्थिर येतील. रिंग लाईट प्रकाश अ‍ॅडजेस्ट करेल.



**झूमचा योग्य वापर**

फोटो घेण्यासाठी झूम या फीचरचा वापर योग्यरीत्या आणि जपून वापरा. कारण अधिक झूम केल्याने फोटोची क्लीऑरिटी खराब होते. त्यामुळे आवश्यक आणि शक्य असल्यास फोटो घेत असलेल्या ऑब्जेक्टच्या जवळ जा. अधिक झूममुळे फोटोचे रिझोल्युशन खराब होऊ लागते आणि स्वस्त फोनमध्ये डिजिटल झूम फारसे चांगले नसते. तसेच स्मार्टफोनमध्ये उपलब्ध असलेले वेगवेगळे मोड वापरा जेणेकरून फोटो अधिक चांगले येतील. मोबाईल फोनमध्ये पोर्ट्रेट, नाईट, प्रो आणि स्लो–मो असे अनेक पर्याय आहेत, ज्याच्या मदतीने तुम्ही चांगला फोटो काढू शकता.

**योग्य फोकसही महत्त्वाचा**

फ्रेमिंग ही देखील महत्वाची गोष्ट आहे. हे आम्ही वरच सांगितलं. फोटो काढताना ऑब्जेक्टला योग्य ठिकाणी ठेवणं महत्त्वाचं आहे. तसंच फोकसही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. कारण फोटो काढताना फोकस योग्यरीत्या केल्यावर ऑब्जेक्टचा फोटो अधिक भारी आणि क्लीअर येईल. फ्रेममधून अनावश्यक वस्तू काढून टाकण्यासह फोकसिंग ही एक अत्यंत उपयोगी टीप आहे.

**एचडीआर मोडचा वापर**

हाय डायनॅमिक रेंज म्हणजेच एचडीआर या मोडच्या मदतीने तुम्ही भारी भारी दर्जाचे फोटो क्लिक करू शकता. म्हणजेच तुम्ही एखादा मोठा फोटो क्लिक करत असाल तर अशा वेळी तुम्ही एचडीआर वापरू शकता. यासह, तुम्हाला तुमच्या फोटोमध्ये बरेच तपशील पाहायला मिळतील. एचडीआर एकाधिक एक्सपोजर कॅप्चर करते आणि फोटोच्या प्रकाश आणि गडद भागांमध्ये चांगले संतुलन राखते. एचडीआरमध्ये पार्क, इमारत, मंदिर किंवा मोठ्या वस्तूंचा फोटो क्लिक करणे एक चांगला पर्याय आहे.

## आला उन्हाळा, हे ध्यानात ठेवा!

- **उन्हाळा** आल्यावर अनेकदा शरीराला नवीन तापमानाशी जुळवून घेण्यात वेळ लागतो. अशात काही लहान आणि सामान्य गोष्टी असतात ज्यांचा आम्हाला विसर पडत असतो तर त्यांना रिकॉल करायला कुठलीच हरकत नसावी.
- आता गरज आहे घरातून बाहेर निघताना सनस्क्रीन लोशन लावण्याची आणि स्कीन झाकून निघण्याची. सोबत पाण्याची बॉटल किंवा ग्लुकोज असणे उत्तम. कॉटनचे हलक्या रंगाचे कपडे परिधान करणे योग्य ठरेल.
- आहार बदल सर्वात महत्त्वाचे पाऊल आहे. म्हणून आता मसालेदार, स्पाईसी, तळकट खाणे टाळा. लिक्विड डाइट अधिक घ्या. घरातून बाहेर पडण्यापूर्वी लिंबू पाणी, ताक किंवा फ्रूट ज्यूसचे सेवन करणे विसरू नका.
- उन्हाळ्यातील फळं कलिंगड, काकडी, खरबूज, द्राक्ष, संत्री, स्ट्रॉबेरी, नारळ पाणी, आंबा आपल्या आहारात सामील करा.
- उन्हाळ्यात रॉक साल्ट, जिरं, बडीशेफ आणि वेलची सारखे मसाले वापरून दही, कैरीचं पना, पुदिना, थंडाई, सातू हे सेवन करणे शरीरासाठी अनुकूल ठरेल.



## केसगळती रोखणारा 'वन मिनिट' उपाय!

**केसगळती ही काही प्रमाणात प्रत्येकामध्ये आढळून येते. केसगळतीचे प्रमाण दिवसाला १०० पेक्षा अधिक असल्यास ती समस्या गंभीर आहे. या समस्येचे एक कारण म्हणजे टाळूला होणारा अपुरा रक्तप्रवाह! मग त्यावरचा एक उपाय म्हणजे टाळूला मसाज करा.**



**केस** धुतल्यानंतर बोटांनी टाळूला मसाज करणे हा केसगळती रोखण्याचा एक सहज-सोपा घरगुती उपाय आहे. मग केसगळती रोखण्यासाठी जरूर टाळा या चुका!

**कसे आहे फायदेशीर?**

डॉ. एच. के. भाकरू यांच्या 'होम रेमेडीज फॉर कॉमन इएलमेंट्स' या पुस्तकात लिहिल्यानुसार थंड पाण्याने केस धुतल्यानंतर टाळूवर हातांच्या बोटांनी मसाज करावा. यामुळे डोक्याजवळील रक्तवाहिन्यांना चालना मिळाल्याने रक्तप्रवाह सुधारतो. परिणामी केसांची वाढदेखील सुधारते.



**तुम्ही काय कराल ?**

तुमच्या सोयीनुसार पाण्याचे तापमान, शाम्पूने केस धुवा. मात्र शेवटी ते कोमट किंवा साध्या पाण्याने धुवून निथळत ठेवा. यामुळे केस गुंतण्याची शक्यता कमी होते. केसांचे गुंतणे रोखण्यासाठी करून पहा हे उपाय.

काही वेळाने केस टॉवेलने पुसा आणि कोरडे करा. त्यानंतर हाताच्या बोटांनी गोलाकार दिशेने मसाज करा.

**खबरदारीचा उपाय**

मसाज करताना तो हळूवार आणि समान प्रमाणात असावा. खूप जोरजोरात केस घासणे, मसाज करताना नखांचा वापर करणे टाळा. यामुळे केसांचे नुकसान होऊ शकते.

### सायीचा उपयोग रंग उजळण्यासाठी करावा

- मुलतानी माती बारीक करून सायीत मिसळून चेहऱ्यावर तसेच कोपरावर लावल्यास रंग उजळतो.
- तीन चार बदाम आणि दहा बारा देशी गुलाबाच्या पाकळ्या वाटून त्यात एक चमचा साय मिसळून ते मिश्रण चेहऱ्यावर लावल्यास चेहऱ्यावरच्या सुरकुत्या आणि काळे डाग नाहीसे होतात.
- सायीत समुद्र फेसची बारीक पावडर मिळवून लावल्यास चेहऱ्यावरची मुरमे बरी होतात.



- मोसंबी किंवा संत्र्याची सालं वाटून त्यात साय मिसळून त्याचा लेप लावल्यास त्वचा मुलायम व स्वच्छ होते.
- एक चमचा साय व एक चमचा सफरचंदाचा रस एकत्र करून फेटून हलक्या हाताने चेहऱ्यावर मालीश केल्यास चेहऱ्याचा रंग उजळतो.
- सायीचा उपयोग औषधासारखाही होतो.

## दही कधी खावे?

**संपूर्ण** वर्षभरामध्ये ज्या ऋतूमध्ये दही अगदी निषिद्ध समजले पाहिजे, असा ऋतू म्हणजे वसंत. वसंत म्हणजे थंडीनंतर येणारा उन्हाळा, सध्या सुरू असलेले दिवस. वसंत ऋतूमधील कफ प्रकोपाचा विचार करता पाळावयाचा नियम म्हणजे दही वर्ज्य करणे. शरीरामध्ये कफ वाढवणारे दही वसंत ऋतूमध्ये सेवन करण्याचा निषेध शास्त्राने केला हे स्वाभाविकच आहे. वसंत ऋतूमधील दह्याचे काही विशिष्ट गुणदोष असतात. ते दही गोड व आंबट चवीचे असते. गोड व आंबट हे दोन्ही रस वसंतामध्ये टाळणे अपेक्षित आहे. ते शरीरामध्ये स्निग्धत्व वाढवणारे असते. वसंत ऋतूमध्ये स्निग्धत्व वाढवणारा आहार टाळायचा असतो. याशिवाय वसंतातल्या दह्याचा अजून एक दोष म्हणजे ते वातल (वात वाढवणारे) असते. त्यामुळे वात प्रकृतीच्या व्यक्तींना, वातविकाराने त्रस्त लोकांना ते योग्य नाहीच.

याशिवाय दही हे अभिष्यन्दी आहे, म्हणजे स्राव वाढवणारे आहे, ज्या दोषामुळे शरीरामध्ये पाणी वाढते. वसंत ऋतूमध्ये आधीच कफ पातळ झाल्यामुळे शरीरामध्ये स्राव, पाणी वाढलेले असताना दह्याचा शास्त्राने निषेध केलेला आहे. दही हे सूज सुद्धा वाढवते, अर्थात अतिप्रमाणात व अवेळी सेवन केले तर. दह्याबाबत वसंत ऋतू ही अवेळ आहे. वसंतामध्ये कफाचा जोर असताना सांधे हे कफाचे स्थान असल्याने सांध्यामधल्या श्लेष्मल त्वचेला सूज येण्याची व त्या श्लेष्मल त्वचेमधून स्राव वाढण्याची शक्यता बळावते. म्हणूनच सूज व स्राव वाढवणाऱ्या दह्याचा त्याग या दिवसांमध्ये करायचा आहे. अर्थात जिथे-जिथे स्राव स्रवतात, ते स्राव वाढवण्याचा, जिथे-जिथे सूज आहे तिथे सूज वाढवण्याचा धोका वसंतामध्ये दही खाल्ल्याने बळावतो.

या दिवसांमध्ये उन्हाळा सुरू झाला म्हणून दह्याचे सेवन सुरू केल्यानंतर विविध कफविकार, उष्णतेचे विविध रोग आणि सूजसंबंधित विकृती झाल्याचे अनुभव दरवर्षी अनुभवायला मिळतात.

उपचाराला दही न खाण्याची जोड दिली तरच हे आजार बरे होतात. केवळ औषधोपचारानंतर आजाराची लक्षणे कमी होतात; पण तात्पुरती; दही खाणे थांबवल्यानंतर मात्र या रुग्णांना आराम मिळालेला दिसतो.



## ऐन कामाच्या वेळी फोन नेटवर्कने धोका दिला? बदला ही सेटिंग, खराब नेटवर्कमध्येही करता येईल कॉल

**फोनमध्ये खराब नेटवर्क असल्यास कॉल करताना खूप त्रास होतो. महत्त्वाची कामंसुद्धा यामुळे रखडू शकतात. तुम्हालाही दररोज या समस्येचा सामना करावा लागत असेल, तर वाय–फाय कॉलिंग तुमची मदत करेल. या ट्रिकच्या मदतीने तुम्ही खराब नेटवर्कमध्येही स्पष्ट व्हॉइस कॉल करू शकाल. ही खास युक्ती अँड्रॉइड तसेच आयफोन युजर्ससाठी आहे. वाय–फाय कॉलिंगसाठी तुम्हाला वाय–फायमध्ये प्रवेश आवश्यक आहे. यानंतर फोनचे नेटवर्क खराब असले तरीही तुम्ही आरामात कॉल करू शकाल. अँड्रॉइड स्मार्टफोनवर वाय–फाय कॉलिंग कसे सुरू करावे ते पाहा.**

**गुगल पिक्सेल डिव्हाइसेस**

सर्वात आधी फोनच्या सेटिंगमध्ये जा. नेटवर्क आणि इंटरनेट पर्यायावर टॅप करा नंतर कॉल आणि एसएमएस पर्यायावर जा. वाय-फाय कॉलिंग पर्याय शोधा आणि उघडा. वाय-फाय कॉलिंग वापरण्यासाठी टॉगल चालू करा.

**वन प्लस युजर्स**

फोनच्या सेटिंग्जमध्ये दिलेल्या मोबाइल नेटवर्क पर्यायावर जाऊन सिम १ वर टॅप करा. नंतर वाय-फाय कॉलिंगचा पर्याय शोधा आणि उघडा. वाय-फाय कॉलिंग चालू करा. येथे तुम्ही उपलब्ध नेटवर्कमध्ये वाय-फाय आणि सेल्युलर कॉलिंगचे प्राधान्य देखील सेट करू शकता.



**आयफोनवर वाय–फाय कॉलिंग कसे सक्रिय करावे?**

सर्वप्रथम सेटिंगमध्ये दिलेल्या फोन ऑप्शनवर जा. नंतर वाय-फाय कॉलिंग पर्यायावर टॅप करा. वाय-फाय कॉलिंग चालू करण्यासाठी टॉगल चालू करा. जर वाय-फाय कॉलिंग सेवा उपलब्ध असेल, तर तुम्हाला स्क्रीनवर ऑपरेटरच्या नावापुढे वाय-फाय दिसेल.

**सॅमसंग आणि बहुतेक अँड्रॉइड डिव्हाइसेस**

प्रथम फोन अ‍ॅप उघडा. नंतर वरच्या उजव्या बाजूला दिलेल्या थ्री डॉट्सवर टॅप करा. सेटिंग्ज उघडण्यासाठी टॅप करा. येथे तुम्हाला वाय-फाय कॉलिंगचा पर्याय दिसेल. ते उघडा आणि टॉगल चालू करा.

## बर्फाच्या पाण्याचे सेवन करत असाल तर सावधान!

**उन्हाळ्यात** तहान भागवण्यासाठी आपण सगळेच थंड पाणी पितो अथवा बर्फ टाकून पाणी पितो, मात्र अधिक थंड पाणी प्यायल्यामुळे पचनास त्रास होतो. यामुळे आरोग्याशी संबंधित अनेक समस्या निर्माण होतात.

- थंड पाण्यामुळे नसा आखडतात. यामुळे पचनाची क्रिया संथ होते आणि बद्धकोष्ठता, गॅस यासारख्या समस्या निर्माण होतात.
- उन्हाळ्यात बाहेरचे तापमान अधिक असते. यात थंड पाणी प्यायल्यास छातीत कफ जमा होऊ लागतो. थंड पाणी प्यायल्यानंतर शरीराचे तापमान मेंटेन करण्यासाठी शरीराला मोठ्या प्रमाणात एनर्जी खर्च करावी लागते. याचा परिणाम पचन संस्थेवर होतो.



- थंड पाण्यामुळे नसा संकुचित होतात. यामुळे हृदयाला ब्लड पंप करण्यासाठी जास्त मेहनत करावी लागते. यामुळे हार्ट बीट संथगतीने होतात.
- थंड पाणी प्यायल्याने प्रतिकारक क्षमता कमी होते. यामुळे अ‍ॅलर्जी तसेच आजारांची भीती वाटते.
- थंड पाणी प्यायल्याने शरीराचे तापमान अचानक बदलते. ज्याचा परिणाम डोकेदुखीसारख्या समस्या उद्भवतात.

# एआय तंत्रज्ञानाचा वापर करून पंधरा दिवसात १९४ केसेस दाखल

■**भाईंदर :** मिरा -भाईंदर, वसई -विरार पोलीस आयुक्तलयात काही दिवसांपूर्वीच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणार्यांवर कारवाई करण्याकरिता मिरा -भाईंदर शहरात कृत्रिम बुध्दीमत्ता प्रणालीचा वापर करण्यास सुरूवात केलेली आहे. एआयच्या मदतीने बिना सीटबेल्टच्या १६३ केस, बिना हेल्मेटच्या ३० केस, इतर १ अश्या एकूण १९४ केस पंधरा दिवसात करण्यात आल्या आहेत. यामुळे बऱ्याच प्रमाणात वाहतूक पोलिसांवरील ताण कमी झाला आहे. आजच्या डिजिटल युगात पोलिसांना अधिक प्रभावीपणे आपले कर्तव्य पार करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. आयुक्तलयात वाढती वाहतूक, अपघाताचे वाढती संख्या आणि वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन रोखण्यासाठी कृत्रिम बुध्दीमत्तेवर आधारीत एक प्रगत आणि स्मार्ट वाहतूक व देखरेख प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. ही प्रणाली कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर करून



वाहतूक नियमांचे उल्लंघन ओळखून त्यावर त्वरित कारवाई करण्यास मदत करत आहे.

मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवस कृती आराखड्याच्या सात कलमी कार्यक्रमांतर्गत पोलीस आयुक्तांच्या संकल्पनेतून आयुक्तालयात नाविन्यपूर्ण आणि तंत्रस्नेही उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सदर प्रकल्प मार्च २०२५ पासून पायलट प्रोजेक्ट म्हणून सुरु असून पहिले चलन ७ एप्रिलला जारी करण्यात आले आहे. कृत्रिम बुध्दीमत्ता प्रणालीद्वारे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन, ई-चलनासाठी थेट फोटो पुरावे, सुरक्षित व शिस्तबध्द वाहतुक व्यवस्था, पारदर्शक व अचुक दंडप्रणाली, अपघातांमध्ये व जनजीवनात सुधारणा असे फायदे होणार आहेत. या प्रणालीमुळे कायद्याची अंमलबजावणी करता-करता नागरिकांचे प्राण वाचवण्यासाठी आणि वाहतुकीचे नियम पाळण्याची सवय होण्यासाठी एक प्रभावी पाऊल उचललेले आहे. सदरची प्रणाली शिस्त, सुरक्षा आणि तंत्रज्ञान याचे परिपूर्ण उदाहरण आहे. सदर प्रकल्पातून वाहतूक व्यवस्थापनात एक महत्वपूर्ण तांत्रिक ड्रोप, जे सध्याच्या पायाभूत सुविधांच्या मर्यादांमध्ये काम करताना रिअल-टाइम अंतर्दृष्टी देण्यासाठी, मानवी प्रयत्न कमी करण्यासाठी आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी कृत्रिम बुध्दीमत्तेचा कसा वापर करता येतो हे दर्शवते. यामुळे वाहतुकीचे नियम तोडर्णायांवर कारवाई करणे सोपे झाले आहे आणि एआय याच्या मदतीने वाहतूक नियम तोडर्णायांवर रोख देखील लावू शकतो.

# स्वच्छतेसाठी ‘चेन्नई पॅटर्न’ राबविणार

## महाराष्ट्रातील पहिलाच उपक्रमः कल्याण-डोंबिवलीत होणार प्रकल्पाचे लोकार्पण

■**कल्याण :** कल्याण-डोंबिवलीकरांना गेल्या कित्येक वर्षांपासून भेडसावणाऱ्या कचरा आणि शहराच्या स्वच्छतेचा प्रश्न सोडवण्यासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने 'चेन्नई पॅटर्न' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे अशा प्रकारचा हा महाराष्ट्रातील पहिलाच तर चेन्नईनंतर देशातील दुसराच उपक्रम असणार आहे. अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत येत्या रविवारी १८ मे रोजी या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचे लोकार्पण केले जाणार आहे.

चेन्नई केवळ भारतातील नव्हे तर जगातील लंडननंतरची सर्वात जुनी महानगरपालिका आहे. कल्याण-डोंबिवली शहरापेक्षा कितीतरी पट अधिक क्षेत्रफळ आणि जवळपास तिपटीने लोकसंख्या असणारे मेट्रोपॉलिटन शहर आहे. कल्याण-डोंबिवलीप्रमाणेच कमी जागेमध्ये घनदाट लोकसंख्या असल्याने काही वर्षांपूर्वीपर्यंत इकडेही कचऱ्याच्या समस्येने नागरिक आणि महापालिका प्रशासन हैराण झाले होते. मात्र साधारणपणे जानेवारी २०२० च्या म्हणजेच कोविडच्या काळापासून चेन्नईने कचरा आणि शहराच्या स्वच्छतेसाठी यशस्वीपणे



### पहिल्या टप्प्यात ७ प्रभागांची निवड

पहिल्या टप्प्यात कल्याण पूर्व, डोंबिवली आणि कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघामध्ये येणाऱ्या महानगरपालिकेच्या ७ प्रभागांची (डी, इ, एफ, जी, एच, आय, जे वॉर्ड) निवड करण्यात आली आहे. या सातही प्रभागांमध्ये सुमित एल्कोप्लास्ट या संस्थेच्या माध्यमातून 'कचरामुक्त शहर' उपक्रम राबविण्यासाठी कचरा संकलन वाहतूक आणि रस्तेसफाईचे अतिशय सूक्ष्म पद्धतीचे नियोजन करण्यात आले आहे.

राबवलेल्या अनोख्या 'कचरामुक्त शहर' उपक्रमाचे देशभर कौतुक केले जात आहे. चेन्नई महानगरपालिकेने उरबेसर सुमीत या जागतिक कीर्तीप्राप्त संस्थेच्या माध्यमातून चेन्नई शहराचा कचरा आणि शहर स्वच्छतेमध्ये शहराचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. विशेष म्हणजे चेन्नईतील नागरिकांनीही या अनोख्या उपक्रमाला तितक्याच सकारात्मकपणे प्रतिसाद दिल्यानेच गेल्या चार वर्षांत या उपक्रमाने शहर स्वच्छतेमध्ये अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत. आता हाच शहर स्वच्छतेचा 'चेन्नई पॅटर्न' कल्याण - डोंबिवलीमध्ये राबविण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे.

**केडीएमसी प्रशासनाकडून ४५ नॉर्मस्**

**(निकष)**

यापूर्वी किती कचरा उचलला जायचा त्याच्या वजनावर संबधित संस्थेला देयक दिले जायचे. मात्र या नवीन संकल्पनेनुसार केडीएमसी प्रशासनाकडून यासाठी तब्बल ४५ नॉर्मस्(निकष) बनवण्यात आले आहेत. हे सर्व नॉर्मस् आणि 'की परफॉर्मन्स इंडिकेटर' तपासूनच या कामाचे देयक दिले जाणार आहे आणि त्यांची पूर्तता न झाल्यास संस्थेवर दंडात्मक कारवाईची तरतूदही महापालिकेकडून करण्यात आली आहे. हा या उपक्रमातील सर्वात महत्त्वाचा भाग (वरढ) असल्याचे मत या क्षेत्रातील तज्ञांनी व्यक्त केले आहे.

**२४ तास ३ शिफ्टमध्ये काम चालणार**

कचरा संकलन, वाहतूक आणि रस्तेसफाई या तीन महत्त्वाच्या मुद्द्यांवर या कचरामुक्त शहराच्या संकल्पनेमध्ये अधिक भर देण्यात आला आहे. विशेष म्हणजे यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ आणि त्याला तंत्रज्ञानाची उत्तम साथ अशी सांगड घालण्यात आली आहे. दिवसातील २४ तास ३ शिफ्टमध्ये हे काम चालणार असून प्रत्येक घराबाहेरील कचरा उचलण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. इतकेच नाही, तर यासोबतच शहरातील मुख्य असो की अंतर्गत रस्त्यांच्या परिणामकारक स्वच्छतेसाठी कुशल मनुष्यबळासोबतच पॉवर स्वीपर मशीनचाही समावेश असणार आहे.

“नागरिकांच्या कचऱ्या संदर्भातील तक्रारींसाठी विशेष ॲप बनविण्यात येणार असून या ॲपसोबतच सोशल मीडिया किंवा फोनद्वारे येणाऱ्या तक्रारी विनाविलंब सोडवण्यासाठी आयसीसीसी चीही निर्मिती करण्यात आली आहे. दरम्यान चेन्नईच्या धर्तीवर सुरू होणाऱ्या या महाराष्ट्रातील पहिल्या 'कचरामुक्त शहर' उपक्रमालाही चेन्नईप्रमाणे कल्याण-डोंबिवलीकरांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल.”

**- अभिनव गोयल, आयुक्त कल्याण -डोंबिवली महानगरपालिका**

# अल्पसंख्यांकांच्या शाळेत मुस्लिम विद्यार्थिनींना प्रवेश नाकारला

## आमदार रईस शेख यांची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

■**मुंबई :** धार्मिक भेदभाव करत मुस्लीम विद्यार्थीना नागपुरातील ज्या ‘दयानंद आर्य कन्या विद्यालया’ने प्रवेश नाकारले, त्या संस्थेवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच विद्यार्थ्यांप्रती कोणताही धार्मिक भेदभाव करण्यात येऊ नये, अशी सक्त ताकीत राज्यातील सर्व शाळांना देण्यात यावी, अशी मागणी समाजवादी पक्षाचे ‘भिवंडी पूर्व’चे आमदार रईस शेख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

जरीपटका भागात नुकतीच धार्मिक दंगल झाल्याचंही ते म्हणाले. विद्यार्थ्यांना धार्मिक भेदभावाची वागणूक न देण्याचे शाळांना आदेश द्या अशी मागणी

### नेमकं प्रकरण काय?

यासंदर्भात आमदार रईस शेख म्हणाले की, नागपुरातील जरीपटका भागात ह्यदयानंद आर्य कन्या विद्यालयह्व आहे. आश्चर्य म्हणजे ही शाळा अल्पसंख्याक गटातील आहे. नागपुरात नुकतीच धार्मिक दंगल झाली होती. त्या पार्श्वभूमीवर या अल्पसंख्याक शाळेने मुस्लीम विद्यार्थीना प्रवेश न देण्याचे धोरण अवलंबले होते. शाळा सचिवांनी विद्यालयातील शिक्षकांना तसे तोंडी आदेश दिले होते. त्यामुळे मुस्लीम विद्यार्थीनींचे प्रवेश अर्ज जागा असूनही प्रलंबित ठेवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस आला आहे.



समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी केलीय. नागपुरात दंगलीनंतर मुस्लीम विद्यार्थीनींना शाळांमध्ये प्रवेश नाकारले गेले. त्यामुळे नागपुरातील दयानंद आर्य कन्या संस्थेवर कठोर कारवाईची आमदार शेख यांनी मागणी केलीय.

**शाळा व्यवस्थापनावर गुन्हा दाखल**

या प्रकरणी संबंधित पालकांनी जरीपटका पोलीस ठाण्यात आणी राज्य अल्पसंख्याक आयोगाकडे तक्रार दिली आहे. शाळा सचिव राजेश लालवानी व शिक्षिका सिमरन ज्ञानचंदानी यांच्यावर भा.न्या. सं. कलम २९९ नुसार धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी गुन्हा नोंद झाला आहे. हा प्रकार गंभीर असून या शाळा व्यवस्थापनावर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे, असा प्रकार राज्यात इतरत्र होवू नये, यासाठी सर्व शाळांना सक्त ताकीद देण्यात यावी. अशी मागणी आमदार रईस शेख यांनी केली आहे. कश्मीरमध्ये पहलगाम अतिरेकी हल्ला प्रकरणानंतर हिंदू आणि मुस्लीम भारतीय नागरिकांनी एकजुटीचे दर्शन दाखवले होते.

देशात धार्मिक सामंजस्य व एकात्मतेची वातावरण निर्मिती होत असताना नागपूरमध्ये मुस्लीम विद्यार्थीनी संदर्भात घडलेली घटना निंदनीय आहे. महिला व बालविकास, शालेय शिक्षण तसेच अल्पसंख्याक विभागाने याप्रकरणी कठोर कारवाई करणे अभिप्रेत असल्याचे आमदार रईस शेख यांनी सांगितले.

# माणगाव रस्ता रुंदीकरणाला बेकायदा बांधकामांचा खो

## मुंबई गोवा महामार्गात विघ्नेच फार

■**पनवेल :** मुंबई-गोवा महामार्गाच्या रुंदीकरणात पनवेलजवळील पळस्पे ते इंदापूर मार्गावर अनेक अडचणी आल्या. त्यामुळे या राष्ट्रीय महामार्गाचे काम रेंगाळले आहे. यातील माणगावजवळील वाहतूक कोंडी सध्या खूप चर्चेत आहे. माणगावमधील गोद आणि काळ नदीवर नव्याने पूल बांधले जात आहेत. असे असले तरी खरे गाडे अडले आहे ते माणगाव आणि इंदापूरच्या रुंदीकरणाचे. हे रुंदीकरण रखडल्याने माणगावजवळ जवळपास रोज वाहतूक कोंडी होत असून ही कोंडी फुटण्यासाठी महामार्ग प्रशासन आणि राजकीय नेतृत्व पुढाकार घेत नसल्याने माणगावकरांच्या हालाला पारावार राहिला नाही. गंभीर बाब म्हणजे माणगावमधील बेकायदा बांधकामांमुळे महामार्ग रुंदीकरणाला खो बसला असून या संदर्भात मुंबई हायकोटाची आदेश बाजूला पडला आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाला सुरुवात होऊन १७ वर्षे झाली. तेव्हाच बेकायदा बांधकामे न हटवल्याने आज त्यांचा अडथळा सर्वांत मोठा ठरत आहे. मुंबई हायकोटार्ने महामार्गावरील बांधकामे हटवण्याचा आदेश दिला होता. मात्र, त्यावर कारवाई न केल्यामुळे माणगावजवळी रस्ता रुंदीकरण रखडले असून याची झळ आज



माणगावकरांना वाहतूक कोंडीच्या रुपाने सोसावी लागत आहे. हायकोर्टाच्या आदेशानंतर राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाने बेकायदा बांधकामांना नोटिसा पाठवण्याचे काम केले. मात्र, कारवाई न केल्यामुळे बेकायदा बांधकामांचे प्रमाण वाढले आणि तीच डोकेदुखी बनली आहे.

आता माणगाव बायपासचे काम पूर्ण होण्यास दोन वर्षे लागणार असल्याचे बोलले जाते. तोपर्यंत माणगावमधील महामागार्चे रुंदीकरणाचे काम केल्यास माणगावकरांचे जगणे सुसह्य होईल.

माणगावप्रमाणेच कळमजे बायपासचेही काम खोळंबले आहे. हा बायपास मुगवली फाटा येथे महामागार्ला मिळतो. बायपास करताना तीन पुलांची कामे कासवगतीने सुरु आहेत. बायपासचे केवळ २० टक्के काम झाले आहे. माणगावसह कळमजे पुलांच्या कामाला अजून वेग आलेला नाही. अशी स्थिती असताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मुंबईतील एका कार्यक्रमात मुंबई-गोवा महामार्ग यंदा जूनपर्यंत पूर्ण होईल, असे वक्तव्य दीड-दोन महिन्यापूर्वी केले होते. त्यांनी हे वक्तव्य कुठल्या आधारे केले, याची चर्चा आजही होत आहे.

सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सर्व मंत्र्यांनी मुंबई-गोवा महामार्गाचे अनेक दौरे केले, अधिकाऱ्यांशी चर्चा केल्या, त्यांना काम पूर्ण करण्यासाठी अनेकदा तंबी देण्यात आली. प्रत्यक्षात महामार्ग आजही अपूर्ण आहे. त्यामुळे रायगडमधील आमदार, खासदार राजकीय इच्छाशक्ती दाखवून मुंबई-गोवा महामार्गाच्या रायगडमधील रखडलेल्या कामाला वेग आणणार का, माणगावकरांची वाहतूक कोंडी फोडणार का, याची उत्सुकता सर्वांना लागून राहिलेली आहे.

# तुमची मुलं स्मार्टफोनवर काय बघतात?

## ११ वर्षीय मुंबईकर मुलीचा स्नॅपचॅटवरुन लैंगिक छळ

■**मुंबई :** हल्ली अनेक अल्पवयीन मुले स्मार्टफोन अगदी सहज वापरतात. पालकांनाही मुलांच्या या लहान वयातच मोबाईल वापरण्याचं फार अपरुप वाटतं. मात्र मुलं स्मार्टफोनवर नेमकं काय करतात याकडे पालकांचं लक्ष असणं आवश्यक का आहे याबद्दल इशारा देणारा एक धक्कादायक प्रकार मुंबईत समोर आला आहे. स्नॅपचॅटवरून बनावट खाते तयार करून ११ वर्षांच्या मुलीची अश्लील छायाचित्रे मागितल्याचा प्रकार कांजूर येथे समोर आला आहे. याप्रकरणी कांजूर मार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून आरोपीचा शोध सुरू ‘केला आहे. आरोपी विकृत असून मुलीच्या नावाने बनावट खाते तयार करून



### मोबाईल देताना पालकांनी सावध रहावं

इन्स्टाग्राम, स्नॅपचॅप आदी माध्यमे मुलांसाठी घातक ठरू शकतात. पालकांनी मुलांना मोबाइल देताना ते त्याचा काय आणि कसा वापर करतात त्याकडे लक्ष ठेवणे गरजेचे आहे, असेही सागर यांनी पालकांना सल्ला देताना म्हटलं आहे.

लहान मुलींना जाळ्यात ओढत असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

**नेमकं घडलं काय?**


मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी ११ वर्षांची आहे. ही पीडित तरुणी कांजूर परिसरात राहते. काही दिवसांपूर्वी स्नॅपचॅटवर तिची एका अनोळखी मुलीशी मैत्री झाली. सान्वी राव नावाने खातं असलेल्या या मुलीचं स्नॅपचॅटवरील खातं 'र्ल्ल५ १ङ्क नावाने होतं. या खात्यावरुन पीडितेशी ओळख वढवल्यानंतर पीडितेच्या अजाणतेपणाता गैरफायदा घेत सान्वी रावने तिच्याकडे अश्लील फोटोंची मागणी केली. अजाणतेपणामुळे पीडितेने संबंधित खात्यावर आपले अश्लील फोटो पाठविण्यास सुरवात केली. त्यानंतर दिवसोंदिवस सान्वी रावची मागणी वाढू लागली. त्यामुळे पीडिता अस्वस्थ झाली. फोटो पाठवले नाहीस आणि माज्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत तर तुझे अश्लील फोटो इंटरनेटवर प्रसारित करण्याची धमकी सान्वीने पाडितेला दिली. यामुळे पीडिता अधिकच घाबरली. आरोपी मुलगी मोबाइलवरून तिला मेसेज पाठवून धमकावून लागली. अखेर तिने हा प्रकार आपल्या पालकांना सांगितला.

आरोपी हा एखादा तरुण असण्याची शक्यता

पीडितेच्या आईने तातडीने कांजूरमार्ग पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी सान्वी राव नाव धारण केलेल्या स्नॅपचॅट आयडीधारकाविरोधात पोक्सोच्या कलम ६७ (बी), तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमम २००० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आम्ही या प्रकरणाचा तपास करीत आहोत. आमचे एक पथक आरोपीच्या मागावर आहे, असे परिमंडळ ७ चे पोलीस उपायुक्त विजयकांत सागर यांनी सांगितले आहे. आरोपी हा एखादा तरुण असण्याची शक्यता आहे. लवकरच त्याला अटक केली जाईल, असेही सागर यांनी स्पष्ट केलं.

# नाशकात अनैतिक संबंधामुळं तरुणाचा जीव गेला

■**नाशिक :** नाशिक जिल्ह्यात अनैतिक संबंधातून एका तरुणाचा जीव गेल्याची घटना समोर आली आहे.लग्नाच्या वाढदिवसाचे फोटो स्टेटसला ठेवल्याच्या रागातून मैत्रिणीनेच मित्राचा खून केला आहे. विल्होळीजवळ तरुणाची हत्या करण्यात आली आहे. ही हत्या अनैतिक संबंधातून झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. लग्नाच्या वाढदिवसाचे फोटो व्हॉट्सॲपच्या स्टेटसला ठेवल्याने कामगारनगर येथील इसम सूरज ऊर्फ पप्पू काशीनाथ घोरपडे याचा दोघा जणांनी खून केला आहे. नाशिकच्या विल्होळी शिवारात धारदार हत्याराने डोक्यावर प्रहार करून खून करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी गुन्हे शाखा युनिट-१ च्या पथकाने मुख्य संशयित आरोपी शशिकांत ऊर्फ नाना रामदास गांगुर्डे यास




### मित्रांसोबत पार्टी साठी गेला अन् खून झाला

मित्रांसोबत पार्टी करण्यासाठी गेलेल्या तरुणाची हत्या झाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी शोध घेतला असता ओवाडी नाला ते दरेगाव हिल टेकडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर सदर तरुणाचा मृतदेह सापडल्याने शहरात एकच खळबळ उडाली. सदर तरुणाच्या शरीरावर धारदार हत्याराने वार केल्याचे प्राथमिक दृष्ट्या दिसून आल्याने सदर तरुण कोणासोबत होता याचा तपास आता पोलिस घेत आहेत.

ताब्यात घेतले असून त्याने साथीदाराच्या मदतीने खून केल्याची कबुली दिली आहे. सातपूर भागातील कामगारनगर येथील रहिवासी असलेले सूरज यांनी त्यांच्या लग्नाच्या वाढदिवसाचे फोटो स्टेटसला शनिवारी ठेवले होते. यामुळे त्यांची मैत्रीण संशयित इंदू विजय साळवे (रा. संघर्षनगर) हिने त्यांना फोन करून त्रास दिला होता. यामुळे सूरज हे विल्होळी येथील तिच्या घरी विचारणा करण्यासाठी गेले असता, तिचा सख्खा भाऊ संशयित शशिकांत गांगुर्डे, नवीन सोनकांबळे, अजय रामदास कांबळे यांनी त्यांना मारहाण केली.

# पुण्यात २७ वर्षीय तरुणीवर बलात्कार

## नाइट शिफ्टला निघालेली असतानाच नराधमाने...

■**पुणे :** पुण्यात पुन्हा एकदा धक्कादायक घटना समोर आली आहे. कामावर जाणाऱ्या तरुणीवर अज्ञात इसमाने बलात्कार केला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून नराधमाला २४ तासांत बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश आले आहे.

चाकण एमआयडी कंपनीत कामावर निघालेल्या तरुणीसोबत ही घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कंपनीत निघालेल्या महिलेला ओढून नेत तिच्यावर बलात्कार करण्यात आला. १३ मेच्या रात्री ११ च्या सुमारास ही धक्कादायक घटना घडली आहे. २७ वर्षीय महिला रात्रपाळीच्या कामासाठी निघाली होती. एका कंपनीत ती हेल्पर म्हणून काम करायची. मेदनकरवाडी येथील या कंपनीच्या अगदी जवळ ती पोहचली. त्याचवेळी तिच्यावर पाळत ठेवून असलेला नराधमाने तिच्यावर हल्ला केला. तिला जबरदस्ती ओढत शाळेच्या मागील बाजूस ओढून नेले.

महिलेने नराधमाला प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याने तिच्यावर बलात्कार करत जीवे ठार मारण्याची धमकी दिली. महिलेने प्रतिकार केला आरोपीला चावादेखील घेतला. मात्र त्याचा काहीएक फायदा झाला नाही. महिलेला तिथेच सोडून आरोपी तिथून पसार झाला. त्यानंतर



तिथूनच निघालेल्या महिला कामगार आणि पुरुषांच्या मदतीने पीडितेना तिथून स्वतःची सुटका करुन घेतली. महिलेने पोलिसांना याबाबत माहिती दिली.

महिलेवर सध्या वायसीएम रुग्णालयात उपचार सुरू असून नराधम प्रकाश भांगरेला बेड्या ठोकण्यात आल्यात. सीसीटीव्हीच्या आधारे त्याचा शोध घेण्यात चाकण पोलिसांना यश आलंय. तो सध्या मेदनकरवाडीमध्ये राहायला आहे. मात्र तो मूळचा अहमदनगर जिल्ह्यातील अकोले गावचा असल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्याने याआधी असे काही कृत्य केलंय का? याचा तपास ही पोलिसांकडून केला जातोय.

**अल्पवयीन मुलीवर बलात्कार**

उलवे येथून एका १५ वर्षीय मुलीवर फिरायला जाण्याच्या बहाण्याने मित्राच्या घरी नेऊन धमकी देऊन बलात्कार केल्याची घटना समोर आलेय. या संदर्भात पोलिसांनी गुन्हा दाखल करून २० वर्षीय आरोपीला अटक केलेय. १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा मित्र साबीर शेख याने पर्यटनासाठी उलवे येथील एका मित्राच्या घरी आणले. तिथे आरोपीने पीडितेला त्याच्याकडे पीडितेचे कपडे बदलतानाचे व्हिडिओ असून तो व्हायरल करण्याची धमकी देऊन पीडितेवर बलात्कार केला.

### साडेपाच वर्षाच्या मुलीचे आधी अपहरण मग ऊसाच्या शेतात नेऊन...!

पुण्यात माणुसकीला काळीमा फासणारी घटना, साडेपाच वर्षाच्या मुलीचे आधी अपहरण मग ऊसाच्या शेतात नेऊन.. !पुणे ढ४ल्ली उ्रीः पुण्याच्या दौंडमध्ये माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडलीय. दौंडमध्ये अवघ्या साडेपाच वर्षाच्या मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यामुळे नराधमांच्या वासनेपुढे त्यांना वय, काळ वेळ या गोष्टी काहीच नसतात हे पुन्हा एकदा सिद्ध झालंय. सध्या या आरोपीला दौंड पोलिसांनी ताब्यात घेतलं. ऊसाच्या शेतात नेऊन साडेपाच वर्षाच्या मुलीवर त्याने अत्याचाराचा प्रयत्न केलाय. पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यात साडेपाच वर्षाच्या मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न झालाय. पुणे सोलापूर महामार्गावर कुरकुंभ परिसरात ही धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी फलटण तालुक्यातील शेरेचीवाडी येथील नवनाथ चंद्रकांत रिठे या 27 वर्षीय व्यक्तीच्या विरोधात दौंड पोलिसात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला असून दौंड पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल आहे. 16 मे 2025 रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. फियार्दीने दिलेल्या माहितीनुसार, त्यांची साडेपाच वर्षांची मुलगी ही पुणे-सोलापूर महामार्गावरील भागवत वस्ती येथील किराणा दुकानासमोर उभी असताना आरोपीने तिचे अपहरण केले. त्यानंतर तिला दौंड तालुक्यातील मळद गावच्या परिसरातील ऊसाच्या शेतात नेऊन तिच्यावर अत्याचार केला. आरोपीने पीडितेच्या अंगावरील कपडे काढून मारहाण केली तसेच लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न केला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधीन राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००0१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com